# सगुणा

एप्रिल-मे-जून २०१७ । वर्ष-५, अंक-२
संपादक : **शोभा करांडे** । संपर्क : ९४२२०१३५८८
मुखपृष्ठ संकलन : **अरुण करांडे**
मूल्य : ३० रुपये । वार्षिक वर्गणी : १०० रुपये, दशवार्षिक वर्गणी : १००० रुपये

---

अनुक्रम

**संपादकीय** । शोभा करांडे । २

**मनुवादी मनोवृत्ती** । न्या. पी. बी. सावंत । ५

**शेतकरी संप** । नीळू दामले । १०

**श्रीमंत माने** । । १३

**तलाक** । विलास सोनावने । १९

**पवित्र कुरआनने फक्त पुरुषांनाच नाही तर स्त्रीयांनाही दिले आहेत अनेक अधिकार, परंतु...?** । चाँद शेख । २१

**माणसांचा धर्म की धर्माची माणसे** । ओंकार महाजन । २३

**रात्री दिवस आम्हां युद्धाच प्रसंग** । पत्रक - युवा भारत । २५

**वृत्तांत - किसान संसद - जींद (हरियाणा)** । दयानंद कनकदंडे । २८

**हा उत्सव अच्छे दिनाचा की मोदींचा?** । दत्तकुमार खंडागळे । ३१

**कापेलली ठसठस** । हिना कौसर खान । ३४

**कविता** । सारिका उबाळे, शोभा करांडे, दीपक बोरगावे । ३८-४०

संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७ माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजमागे, पुणे ४११ ०३०. दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५ । ०९८२०२३५०३०

---

MAHMAR/2013/52241 / website : www.sagunatrust.org / Email : shobhakarande62@gmail.com

---

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्री बालाजी एंटरप्रायजेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७ माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजमागे, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केला.

(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

# सगुणा

## संपादकीय

गेल्या काही वर्षांत देश अनेक विषयांनी ढवळून निघाला आहे. दररोज नवीन संघर्ष व मानवनिर्मित आव्हानांना सामान्य माणसांना तोंड द्यायची तयारी ठेवावी लागते.

सामान्य माणसाचे जगणे कसे अधिक गुंतागुंतीचे करायचे याचा सरकारने चंग बांधलाय. जनतेला दिलेली वचनं व आश्वासनं यांना पद्धतशीर पानं पुसून उलट जनतेला कंगाल करणाऱ्या अनेक युक्त्या, कारस्थाने करताना हे सरकार दिसत आहे. देशाशी व देशातील लोकांशी व्यवस्थेला काही देणं-घेणं आहे असा संशय येण्याजोगीदेखील परिस्थिती नाही.

देशभर जनता अराजकाने कावलेली आहे. सरकार कोणासाठी काम करतंय हा प्रश्नच आहे. माध्यमांना हाताशी धरून रोज नवे नवे सनसनाटी जातीय व धार्मिक विषय सतत चघळले जातात. लोकांचे रोजी-रोटीचे प्रश्न ऐरणीवर न आणता समाजात तेढ निर्माण करणाऱ्या चर्चा पसरवल्या जातात. सगळे राजकीय पक्ष या कामात एक दिलाने एकजूट होताना दिसतात. विरोधी पक्ष (विपक्ष) नावाची संकल्पनाच समोर दिसत नाही. सगळेच भांडवलदारांच्या कृती कार्यक्रमावर काम करताना दिसत आहेत.

देशातले मूळ प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, रोजगाराचे प्रश्न, असंघटीत कामगारांचे प्रश्न, धर्म आणि व पुरुषी मानसिकता यामुळे निर्माण झालेले स्त्रियांचे प्रश्न बाजूला सारून व्यवस्था भांडवलदारांच्या हिताचे कार्यक्रम राबवण्यात मग्न आहेत. लोकाभिमुख शासन, कल्याणकारी शासन या भूमिका केव्हाच धुळीला मिळाल्या आहेत. समृद्धी मार्ग, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॅरिडोअर, कलकत्ता-अमृतसर एक्सप्रेस हायवे यासारखे अनेक प्रकल्प, मेट्रो प्रकल्प यासारखे अनेक प्रकल्प राबवून हजारो एकर शेती, सुपीक जमिनी ताब्यात घेण्याची मोठी कारस्थाने शिजलेली आहेत. शेकडो एकर जमिनी परदेशी कंपन्यांना विकण्यात आलेल्या आहेत.

या जमिनीवर राहणारे कष्टकरी व त्यांची उपजीविकेची साधने दोन्ही देशोधडीला लागले आहेत. या परांगदा/विस्थापित लोकांना स्वत:च्या मुळापासून जगण्याच्या संघर्षात

मोठ-मोठ्या शहरामध्ये जनावरांसारखं जीवन जगणं भाग पडत आहे. खेडी ओस, भकास, उद्ध्वस्त झालेली आहेत. जनावर, पशुपशी बेसहारा, कुपोषित वणवण भटकून मृत्युला कवटाळत आहेत. आधीच्या सुजलाम सुफलाम जमिनीवर प्रदूषित, परकीय औद्योगीकरण होत आहे.

१००% विस्थापितांपैकी १०% विस्थापिकांनासुद्धा त्याठिकाणी रोजी-रोटी मिळण्याची शाश्वती नाही. हरित पट्टे, पर्यावरणपूरक इलाके-हिरवीगार जंगले सगळे बेचिराख होताना दिसत आहे. यामुळे निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न सोडवण्याची लायकी या व्यवस्थेची आहे का? दरवर्षी वाढणारं प्रचंड तापमान व निसर्गाचा असमतोल यामुळे माणूस मृत्युच्या दाढेत जगतोय.

कृषीप्रधान असणारा भारत देश केवळ शेतीवर समृद्धीत गुजराण करू शकत होता. त्यावर आधारित असणारे सर्व उद्योगधंदे बेरोजगारीला उत्तर होते. शेतीची चुकीची धोरणे राबवून शेतकऱ्यांना मूळ जैविक शेतीतून फूस लावून रासायनिक शेती करण्यास भाग पाडणारी नीती राबवून शेती उद्योगाचे तीन-तेरा वाजवण्यात आले आहेत.

रासायनिक खतांच्या प्रचंड वापरामुळे अधिक विषारी झालेले पाणी व जमीन यामुळे लोक कॅन्सर, किडनीचे आजार आणि अशाच भयानक व्याधींना ग्रासलेले आहेत. वैद्यकीय उद्योगधंद्याचं प्रचंड पीक भारतात जाळ विणून बसलं आहे. सामान्य जन त्यातूनही भरडून निघत आहे.

मूर्खपणाची शैक्षणिक धोरणं व जीव शिक्षणाचा अभाव यामुळे साक्षर अडाणी विद्यार्थ्यांचं उदंड पिक आलेलं आहे. भांबावलेला, गोंधळलेला व व्यवस्थेमध्ये स्वत:चे स्थान पाहू शकत नसल्यामुळे एक मोठा लोंढा बाबा, बुवा, गुरू, सत्संग या आभासी शांततेच्या शोधात आहे. पद्धतशीरपणे या लोकांना विचारातून, भानातून, कृतीतून कापले जाते व अध्यात्माच्या नावाखाली कृतीहीन बनवले जाते आणि व्यवस्थेने पढवलेले धार्मिक घोषवाक्य ते घोकत राहतात.

देशभरात अशाच प्रकारचे वातावरण आहे. प्रसिद्धी माध्यमातून चाललेला प्रसार मात्र ठासून विकास आणि प्रगतीचा गवगवा करणारा आहे. एक प्रकारची हुकूमशाहीच शासन करत आहे, असेच वातावरण आहे.

प्रामाणिकपणे काम करणारे व व्यवस्थेला मानवतेच्या झेंड्याखाली खेचण्याचा कायम प्रयत्न करणारे निडर, प्रामाणिक, लोकांमध्ये काम करणारे कार्यकर्तेही आता खूप कमी आहेत. त्यांचा संघर्ष व लढा खूप काळापासून सुरूच असला तरी आता त्याला

जनसामान्यातून प्रतिसाद मिळायला हवाय. लोकांनी स्वत:च्या लढाया स्वत:च लढायला हव्यात. आणि नुकत्यात झालेल्या शेतकरी आंदोलनातून या लढ्याचं स्वरूपही कळायला लागलंय.

असंतोषाला दाबण्याचे क्रूर प्रयत्न चालून राहणार आहेत. कष्टकरी, शेतकरी, तरुणाई, महिला या सगळ्यांनीच आता लढ्याचं नेतृत्व करायला हवं. निरुपद्रवी सज्जन बनून कुठल्यातर कोपऱ्यात दिवस ढकलत राहण्यापेक्षा लढाईत सामील झाले पाहिजे व आपल्याला नवनव्या चक्रात पिसून काढणाऱ्या व्यवस्थेला जाब विचारला पाहिजे.

खेड्यातून शहरात विस्थापित झालेल्या लोकांना अनेक प्रकारचे संघर्ष करावे लागतात. यामध्ये त्यांच्या ओळखीचे, अस्तित्वाचे संघर्ष, प्रश्न असतात. या सगळ्या परिस्थितीचा फायदा घेत व्यवस्था या सामान्य लोकांना राजकीय, धार्मिक राजकारणात वापरत आहे. यात सामान्य जनताच भरडली जाते, ती एकमेकांशी विनाकारण लढत एकमेकांना संपवण्याच्या मार्गावर आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात दंगे, हिंसा होत आहेत. अशा परिस्थिती ना स्त्रिया सुरक्षित आहेत, ना मुले... एकूणच अशा वातावरणात कुणीच सुरक्षित नाही... व्यवस्थेच्या या जाळ्याची नीट विचार करायला हवा.

संपादक
**– शोभा करांडे**

# मनुवादी मनोवृत्ती

## – न्या. पी. बी. सावंत

आज आमच्या देशात जे राजकीय व सामाजिक वातावरण निर्माण झालेलं आहे, ते कुठल्या व्यक्तीमुळे नाही, तर एका मनोवृत्ती व विचारसरणीमुळे. जी देशाला नवी नाही. तिचा शाप या भूमीला, पुरातन काळापासून म्हणजे आर्यांच्या आगमनापासून (१५०० बी.सी.) लागला आहे. तिला मनुवादी म्हणून ओळखले जाते. चातुर्वर्ण्य, विषमता, अस्पृश्यता व स्त्रीद्वेष ही तिची अपत्ये आहेत. उच्चवर्णीय व पुरुषी अहंगंड हे तिचे निर्माते आहेत. पितृसत्ताक कुटुंब व समाजपद्धती ही तिची शस्त्रकुंडले आहेत. चातुर्वर्ण्याने केवळ सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक विषमता निर्माण केली नाही, तर सर्व समाजाला असंख्य जातीउपजातीत विभागून व त्यांच्यात एकमेकांविषयी विद्वेष व संघर्ष निर्माण करून, ते कधीही एकत्र येणार नाहीत याचा बंदोबस्त केला. यामागील हेतू एकच होता. तो हा की उच्चवर्णीयांच्या हाती सर्व सत्ता व संपत्ती केंद्रित व्हावी व त्याप्रमाणे ती झाली. आज शेकडो वर्ष ते तिचा अनिर्बंधपणे उपभोग घेत आहेत. जाती केव्हा व कशा निर्माण झाल्या हा संशोधनाचा विषय होऊ शकतो व ते जाणून घेणे विशेष महत्त्वाचे नाही. परंतु जातींची उच्चनीच क्रमाने उतरंड निर्माण करणारी चातुर्वर्ण्ययंत्रणा कुणी तयार केली, हे समजण्याला फारशा बुद्धीची गरज नाही. निम्न जातींनी ती नक्कीच तयार केली नाही. जे या व्यवस्थेत सर्वोच्च स्थानी विराजमान झाले आहेत, त्यांनीच आपल्या स्वार्थासाठी हे षड्यंत्र निर्माण केलं, हे स्पष्ट आहे.

चातुर्वर्ण्याने केवळ समाजात दुही व विषमता निर्माण केली नाही. तिने या देशातील ९९ टक्के लोकांना शारीरिक, मानसिक व बौद्धिकदृष्ट्या दुर्बल ठेवलं. जातीची उतरंड तयार करण्याबरोबरच उच्चवर्णीयेतर व सर्व स्त्रीया (उच्चवर्णीयातीलही), यांना ज्ञानार्जनाची बंदी घातल्यामुळे व स्वदेशीयांना परदेशगमनास प्रतिबंध केल्यामुळे, अत्युच्चवर्णीयांना म्हणजे ब्राह्मणांना, ज्ञानाची मक्तेदारी निर्माण करता आली. ज्ञानाची मक्तेदारी ही सर्व मक्तेदारीच्या मुळाशी असते. ब्राह्मण सांगेल व लिहिल तेच व तेवढेच ज्ञान व ते त्यांनीच निर्माण केलेल्या ईश्वराने सांगितलेले, ही त्यांचीच बतावणी. शिवाय ब्राह्मण हा पृथ्वीवरील देव, म्हणजे भूदेव. ही त्यांचीच शिकवण. त्यामुळे त्यांच्या उक्तीला व कृतीला अपोआप दैविक मान्यता. ज्ञानाच्या या मक्तेदारीमुळे इतरजनांना, त्यांनी निर्माण केलेल्या देव व धर्माच्या जाळ्यातही गुरफटून टाकण्यात आलं व त्याचा धूर्तपणे वापर करून, भूतलावरील सर्व सत्ता व संपत्ती काबीज करता आली. राजा असो वा रंक, सर्वजण भूदेवांच्या चरणी नतमस्तक. अन्यथा ते पापी व नरकात जाण्यास पात्र. तशा शापाची त्यांना सदोदित भीती. मुद्दामहून अज्ञ ठेवलेल्या शस्त्रधारी योद्ध्यावरही पळीपंचपात्राची अशी अधिसत्ता. या सत्तेच्या जोरावर, मूठभर भूदेवांकडून निम्न जातींचा अमानुष छळ, पिळवणूक. त्यांना अपमानास्पद व पशूपेक्षाही हीन व गुलामीची वागणूक, मानवजातीला काळीमा लावणारी अस्पृश्यता व त्याच्यावर स्वामित्वाच्या अभिनिवेशाने शेकडो वर्ष गाजवलेली सत्ता. यामुळे निम्न जातींना या भूतलावरील नरकातून सुटण्याची उत्कंठा लागणे अपरिहार्य होते. म्हणूनच त्यांनी मोगलांच्या राज्यात मुसलमान धर्मात व

ब्रिटिशांच्या राज्यात ख्रिश्चन धर्मात प्रवेश केला. त्यापूर्वी त्यांनी बौद्ध व जैन धर्मात इसवी सन १६व्या शतकात प्रवेश केला. परंतु इस्लाम धर्मात झालेला त्यांचा प्रवेश हा फार मोठ्या संख्येने झाला. देशाच्या उत्तर पश्चिम भागामध्ये व बंगालमध्ये सलग भूप्रदेशात झाला. हा प्रवेश सक्तीने अतिअल्प प्रमाणात झाला. बहुसंख्य निम्न जातीतील लोक हे स्वखुशीने या धर्मात गेले. हिंदू धर्मातील जाचाला कंटाळल्यामुळे, इस्लामसारख्या समतेच्या तत्त्वावर आधारलेल्या धर्मात त्यांनी प्रवेश करणं साहजिकच होते. हे खुद्द स्वामी विवेकानंदांनीही आवर्जून सांगितलं आहे. आमच्या देशाची १९४७ साली धर्माच्या आधारावर जी फाळणी झाली, तिचं मूळ हे असं या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत आहे. आजचे ९९.९९ टक्के मुसलमान मग ते पाकिस्तानातले वा बांग्लादेशातले असोत, वा या देशातील. ते पूर्वीचे हिंदूच आहेत. काही उच्चवर्णीय, मग ते ब्राह्मण असोत वा अन्य, इस्लाम धर्मात वा ख्रिश्चन धर्मात गेले, ते सत्तेच्या व संपत्तीच्या अपेक्षेने. सारांश चातुर्वर्ण्य व्यवस्थेने या देशाचीही फाळणीही घडवून आणली आहे. गेल्या शतकात १९५६ साली डॉ. आंबेडकर व त्यांच्या लाखो दलित अनुयायांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला, तोही हिंदू धर्माने त्यांना दिलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळेच. आजही देशात दलितांविरुद्ध व इतर धर्मीयांविरुद्ध कमालीचा द्वेष निर्माण करण्यात येत आहे. त्यांच्यावर निरनिराळ्या कारणांनी हिंसक हल्ले करण्यात येत आहेत. या देशात अशांती व असुरक्षिततेच वातावरण मुद्दाम होऊन निर्माण करण्यात येत आहे. अलिकडेच म्हणजे १९९२च्या डिसेंबर महिन्यात उत्तर प्रदेशातील ४०० वर्ष जुनी बाबरी मशीद पाडण्यात आली. २००२ साली गुजरातमध्ये अहमदाबाद व इतर परिसरात सुमारे २००० मुसलमान स्त्री, पुरुष, मुले यांची शासनाच्या चिथावणीने व सहाय्याने हत्या करण्यात आली. त्यावेळी आजचे पंतप्रधान मोदी हे गुजरात राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्रीही होते व अमित शहा भाजपाचे अध्यक्ष, हे त्यांचे राज्य गृहमंत्री होते. या घटनानंतरच देशात मुस्लीम दहशतवाद्यांचे हल्ले झाले व देशातील निरपराध लोकांना आपले प्राण गमवावे लागले. दहशतवाद्यांचा निषेध करणं जितकं गरजेच आहे, त्यापेक्षा अधिक ज्यांच्या कृष्णकृत्यांमुळे आपल्या देशातील लोकांवर हल्ले झाले, त्यांचा सर्वाधिक धिक्कार झाला पाहिजे. या प्रकारामुळे आम्ही काश्मीरमधील आमच्या मुसलमान बंधू भगिनींना काय संदेश पाठवत आहोत? त्याचप्रमाणे ख्रिश्चनांवर व त्यांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करून ईशान्यपूर्वतील बहुसंख्य ख्रिश्चन वस्तीची राज्ये आहेत, त्यांना आम्ही काय सांगत आहोत? त्यांनी या देशात राहावे की नाही? आज काश्मीर जनतेबद्दल जी दुजाभावाची भावना पोसली जात आहे, त्याचा परिणाम काय होणार आहे, हे सुबुद्ध जनतेला सांगण्याची गरज नाही. उच्चवर्णीयांच्या या स्वार्थी, आपमतलबी, अदूरदर्शी कृतींमुळे, देशाच्या आणखी किती फाळण्या होणार आहेत? हे देशद्रोहाचं कार्य नाही का?

आजच्या लोकशाही राजवटीतही आपले वर्चस्व राखण्यासाठी उच्चवर्णीयांची सारखी धडपड चाललेली आहे. एकतर सर्व कारभारयंत्रणा पूर्वीपासूनच त्यांच्या ताब्यात आहे. मग ते महसूल खाते असो वा पोलीस खाते. मोगलांच्या व इंग्रजांच्या काळातही हीच परिस्थिती होती व आजही बहुतांशाने तीच आहे. राज्याचा कारभार, मंत्र्यांपेक्षा संत्रीच प्रत्यक्षात चालवत असतात. शेतीपासून शिक्षणापर्यंत व गृहखात्यापासून अर्थखात्यापर्यंत सर्व ध्येय, धोरण, कार्यक्रमांची सूत्र त्यांच्या हाती असतात. खुद्द निवडणूक यंत्रणेवरही यांचाच प्रभाव. लोकशाही म्हणजे बहुजनांची राजवट. बहुजनात उच्चवर्णीय अत्यल्प म्हणून लोकशाहीत आपली सत्ता टिकवण हा त्यांचा जीवन मरणाचा प्रश्न असतो. त्यामुळे आपल्याकडे असलेल्या सर्व अस्त्रांचा

उपयोग करून ते ती टिकवण्याचा प्रयत्न करतात. बहुजनात फूट पाडत राहणे हे त्यांचे ब्रह्मस्त्र. जातींमुळे आधीच फाटाफूट झालेल्या समाजात, या शस्त्राचा उपयोग फारच परिणामकारक होता. आजतर या फाटाफूट झालेल्या समाजात, या शस्त्राचा उपयोग फारच परिणामकारक होतो. आजतर या फाटाफूटीकरता आरक्षण, गोमांस, गोहत्या, धर्मांतर, 'लव्ह जिहाद' आदिंचा कुशलतेने उपयोग करण्यात येत आहे. स्वत:ची सत्ता टिकवण्याकरता, देशाची व समाजाची कितीही शकले झाले तरी त्यांना पर्वा नाही. प्रत्येक राज्यातील बहुसंख्य जातीविरुद्ध इतर जातींना एकत्र करण्यापर्यंतच हे कुटील प्रयत्न थांबत नाहीत. इतर जातीतही एकमेकांविरुद्ध गट तयार करण्याच्या कारवाया चालूच असतात. दलित व ओबीसी जातींमध्येही बहसुंख्य असलेल्या जातींविरुद्ध इतर दलित व ओबीसी जातींना चिथवून त्यांच्यात विद्वेष निर्माण करण्याचे कट शिजत असतात. आपल्याजवळ आपल्या जातीचं संख्याबळ अत्यल्प आहे, याची सतत जाणीव असल्यामुळे, इतरांतील दुही हीच आपली शक्ती हे ते ओळखून आहेत. दुर्दैवाने इतरांना मात्र हे सत्य उमजत नाही. त्याचं दुसरं अस्त्र म्हणजे बहुजनातील तथाकथित पुढाऱ्यांना निरनिराळी आमिष दाखवून स्वत:कडे वळवणे, अशी विकत घेतलेली अनेक मेंढरं व गुरंढोरं त्यांच्या गोठ्यात नेहमीच बांधलेली असतात. बहुजनातील काही ढोंगी, स्वार्थी व मतलबी लोक तर त्यांच्याकडून मिळणाऱ्या चारापाण्याची वाटच पाहत असतात. या सर्वांकडून बहुजनांना फोडण्याचं काम चालूच असतं व त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून विरोधी शक्तींचा निरनिराळ्या मार्गाने, प्रसंगी हत्या करूनही बंदोबस्त करण्यात येतो. गरीब निरनिराळे असतात, हे समजण्याला बहुजनातील तथाकथित शिक्षित लोकानांही फार काळ लागतो. तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

बहुजनांना नेहमीच शारीरिक, मानसिक व बौद्धिकदृष्ट्या दुर्बल ठेवण हा तर मनुवाद्यांचा आरंभापासूनच मनसुबा. चातुर्वर्ण्याची निर्मितीच त्याकरता झाली. त्यामुळे आज हजारो वर्ष बहुजन सर्वदृष्टीने विकलांग राहिले आहेत व देशाला आपल्या विकासात, त्यांच्या योगदानाला मुकावे लागले आहे. आज देशाचा तथाकथित विकास हा मूठभर अल्पसंख्याकांनी अल्पसंख्यांकरता केलेला आहे. देशाच्या प्रगतीत जर देशातील शंभर टक्के लोकांचा सहभाग असता, तर हा देश सर्व क्षेत्रात जगातील एक अव्वल दर्जाचा देश म्हणून गणला गेला असता. परंतु मनुवाद्यांना या देशाच्या प्रगतीची कधीच पर्वा नव्हती व नाही. त्यांना सतत स्वत:च्या स्थानाचीच काळजी असते. म्हणूनच आजही त्यांचा उद्देश व कार्यक्रम हा बहुजनांना जास्तीत जास्त दुर्बल ठेवणं, कमीत कमी समर्थ करणं हाच राहिला आहे. आजच्या विकासाची दिशाही मूठभरांच्या विकासाचीच आहे.

त्यामुळे जनतेला तिच्या दु:स्थितीची दारिद्र्याची मूळ कारणे समजून देणे व या कारणांपासून लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवणे, आपापसातील भांडणात त्यांना गुंतवणे, काल्पनिक बाह्य शत्रू उभे करणे व त्यांच्याविरुद्ध त्यांना सतत चेतावणी देत राहणे इत्यादी खेळ या शक्ती नेहमी खेळत असतात.

आज या शक्तींना शिक्षणाची दारे इतरांकरता बंद करता येत नाहीत. परंतु कुठलं शिक्षण द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार आजही त्यांनी आपल्या हाती राखून ठेवला आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी नेमायची क्रमिक पुस्तके, अवांतर वाचनासाठी नेमलेली पुस्तके, शिक्षणाचा आशय, शाळा कॉलेजातील शिक्षण, वाद-विवाद, चर्चा, व्याख्याने, उत्सव-समारंभ, एकूण शैक्षणिक, व सांस्कृतिक वातावरण यावर यांचच नियंत्रण असतं. आज तर राष्ट्रीय पातळीवर शिक्षणाचं मनुवादीकरण (संघीकरण/आर.एस.एससीकरण) करण्यासाठी सर्व

केंद्रिय शिक्षण संस्थांवर संघाच्या एकनिष्ठ स्वयंसेवकांनाच उघडपणे नेमण्यात येत आहे.

शिक्षणाच्या मनुवादीकरणाबरोबर, सर्व देशाचच संघीकरण करण्यासाठी सर्व प्रसार माध्यम वर्तमानपत्रापासून ते दूरदर्शनपर्यंत, त्याचप्रमाणे सामाजिक माध्यम (सोशल मिडिया), चित्रपट, रंगभूमी, सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रम, सभा-संमेलन, उत्सव, जाहिराती, प्रचार वाङ्ग्मय आदि सर्व मार्गांचा सर्रास उपयोग करण्यात येत आहे. असत्य, अर्धसत्य, द्वेष, धर्मांधता, जातीयता व असहिष्णुता यांनी पेरलेला अपप्रचार तर अहोरात्र चाललेला असतो. त्यामुळे समाज जीवन अस्थिर, अशांत व असुरक्षित होत चालले आहे. यातूनच जाती जमातीत संघर्ष, दंगेधोपे व हिंसाचार पेटतो आहे. देशात आज एक अंधारयुग अवतरत आहे.

त्यातच काही संघवाद्यांनी बहुजनातील तरुणांना गाठून, त्यांचे पद्धतीशीर संघीकरण करण्यासाठी आश्रम उभारले आहेत. या आश्रमात त्यांना इतर सर्व धर्मीयांचा द्वेष, संविधान व त्यातील लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता या तत्त्वांविरुद्ध घृणा, एकतंत्री हुकूमशाहीबद्दल प्रेम, चातुर्वर्णीय हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व, पोथीपुराण, अनैतिहासिक घटना, देवदेवता, अंधश्रद्धा, भाम्रक व अशास्त्रीय गोष्टी, पोथीनिष्ठा, दैववाद, कर्मसिद्धांत पुराणमतवाद आदिंचं शिक्षण देण्यात येतं. तरुण वयापासूनच त्यांना बौद्धिक व मानसिकरित्या गुलाम करण्यात येतं. इतर संघाप्रमाणे त्यांच्या डोक्याची मडकी करण्यात येतात. त्यांच्यातून हिंदू जिहादी, सनातनी व तालिबानी निर्माण करण्यात येतात. कालांतराने ही मडकी इतकी पक्की होतात की त्यांच्यावर कुठल्याही ज्ञानाचा व विज्ञानाचा परिणाम होत नाही. ते बौद्धिक रुग्ण होतात. आपल्याकडे मानसिक रुग्णांसाठी औषधोपचारांची सुविधा आहे, रुग्णालयेही आहेत. परंतु या बौद्धिक रुग्णांवर कुठले उपचार करायचे? त्यांना कुठल्या रुग्णालयात पाठवायचे?

आज गेली ९० हून अधिक सर्व राष्ट्रीय, स्वयंसेवक संघ व त्याच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, मनुवादी विचारसरणीचा प्रपंच व प्रचार करत आले आहेत. आज तर ते देशाची राजसत्ता, जी ते आजपर्यंत अप्रत्यक्षपणे भोगत होते, ती प्रत्यक्ष हस्तगत करण्यात यशस्वी झाले आहेत. देशपातळीवर महाराष्ट्रातील पूर्वसुरीची पेशवाई स्थापन झाली आहे. तिचे स्वरूप व कार्यपद्धती परिस्थितीनुरूप बदलली आहे.

या शक्तीचे चाळे मात्र अव्याहत चालू आहेत. आजवर त्यांनी आपल्या मार्गात आड येणाऱ्या व्यक्ती व त्यांचे विचार आणि तत्त्वज्ञान यांचा निरनिराळ्या मार्गांनी बंदोबस्त केला आहे. कट, कारस्थान, खून खराबा त्यांना निषिद्ध नाही. आपल्याला गैरसोईचे वाटणारे वाङ्मय, ऐतिहासिक कागदपत्र व पुरावे नष्ट करणे व खोटे कागदपत्र व पुरावे तयार करणे हा तर त्यांचा नित्याचा उद्योग. त्यामुळे खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करणे त्यांना सहज शक्य झाले आहे. अशा करामती करून लिहिलेली पुस्तके इतिहासाची चोपडी म्हणून वाचकांवर लादली म्हणजे यांचा हेतू सफल होतो. हेतू असतो उच्चवर्णीयांकडे सर्व प्रशंसनीय घटनांचे श्रेय घेणे व त्यांचे दोष, गुन्हे, स्वार्थी डावपेच, समाज द्रोही कृत्ये पांघरूण घालणे, नायकांना खलनायक व खलनायकांना नायक बनवणे.

ही शक्ती म्हणजे वास्तवात उच्चवर्णीयांची स्वार्थी मनोवृत्ती आहे. ती मनुस्मृतीच्या काळापासून आजतागायत तशीच कायम आहे. उलट आज ती अधिकाधिक बळकट होत आहे व करण्यात येत आहे. प्रथमपासूनच इतरांपासून अलग राहिल्यामुळे, लोकशाही राजवटीत उच्चवर्णीयेतरांच्या बहुतमांवर

मात करण्यासाठी अशा मनोवृत्तीची या शक्तीला अधिकच गरज भासत आहे. त्यामुळे तिच्या फुटपाड्या कारवायांना अधिक पाय फुटू लागले आहेत. अपरिहार्य परिस्थितीशी जुळवून घेणं, आहे त्या परिस्थितीत सर्व उपलब्ध अवकाशंचा उपयोग करणं, नवीन अवकाश तयार करणं व अखेर प्रतिकूल परिस्थितीवरही मात करून आपलीच सत्ता निर्माण करणं हे या शक्तीला बुद्धी चातुर्य, संघटना कौशल्य व चिवटपणा यामुळे शक्य होतं य आज ते प्रत्यक्षातही दिसतही आहे.

मनुस्मृतीनिर्मित चातुर्वर्ण्य, स्त्रीदास्य व सतीप्रथेतून स्त्रीहत्याकांड, अस्पृश्यता व ज्ञानाची मक्तेदारी व सर्व प्रकारची विषमता यामुळे देशाचा आजवर झालेला विनाश हा कमी झाल्यामुळे की काय आज पुन: मनुस्मृतीची नव्या अवतारात पुनर्स्थापना करण्याची मागणी आज मनुवादी शक्ती करत आहेत. हा केवळ सत्तेचा उन्माद नाही तर बेबंद बेजबाबदारपणा व समाजद्रोह, घटनाद्रोह आणि देशद्रोहही आहे.

इथे एक गोष्ट आवर्जून स्पष्ट केली पाहिजे. सर्व ब्राह्मण मनुवादी नाहीत व सर्व मनुवादी ब्राह्मण नाहीत.उलट काही ब्राह्मणांनी या मनुवादी मानसिकतेचा अत्यंत परखड व जहाल भाषेत धिक्कार केला आहे. त्या करता समाजसुधारक चळवळीही झाल्या आहेत. आज ज्या हिंदूधर्मात सुधारणा दिसून येतात त्या त्या चळवळीचा परिपाक आहे. १८६२ च्या सती बंदीच्या कायद्यापासून ते १९५५-५६ च्या हिंदू कौटुंबिक कायद्यापर्यंत सर्व सुधारणांचे जनकत्व या समाजसुधारणा चळवळींकडे आहे.

मनुस्मृती ही अप्पलपोट्या, स्वार्थी, स्वकेंद्रित, पुरुषी अहंगडांतून निर्माण झालेली व एका विशिष्ट समाज समूहाकरता खास अधिकार व सवलतींची तरतूद करण्याकरता व इतरांना त्या समूहाचे दास करण्याकरता रचण्यात आलेली संहिता आहे. ती विशिष्ट मनोवृत्तीची द्योतक आहे. जोपर्यंत ही मनोवृत्ती नाहीशी होत नाही, तोपर्यंत या ना त्या स्वरूपात ती या देशाला नेहमीच हानिकारक ठरणार आहे. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती १९३० साली जाळली. परंतु त्यामुळे मनुस्मृती निर्माण करणारी मनोवृत्ती नष्ट झाली नाही. आम्हाला गरज आहे ती या मनोवृत्तीला जाळण्याची, या मनोवृत्तीमुक्त भारताची.

पुणे दि. २० मे २०१७

**न्या.पी.बी.सावंत**
(माजी न्यायमूर्ती सर्वोच्च न्यायालय, दिल्ली)
(माजी अध्यक्ष प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया)
(माजी अध्यक्ष प्रेस कौन्सिल जागतिक संघटना)
फोन : ०२०-२७२९३०७६

**-: वाचकांना आवाहन :-**
ज्या वर्गणीदारांचे पत्ते/संपर्क क्रमांक (दूरध्वनी) बदलले आहेत, अशा वर्गणीदारांनी कृपया आपला बदललेला पत्ता वा संपर्क क्रमांक 'सगुणा' कार्यालयाला कळवावा. जेणे करून अंक परत न येता आपल्यापर्यंत पोहोचू शकेल.
अधिक माहितीसाठी : सगुणा कार्यालय
दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५
९८२०२३५०३०

# शेतकरी संप

## नीळू दामले

एक अटळ गोष्ट घडली. शेतकऱ्यांनी संप केला. संप म्हणजे शेतमाल बाजारात जाऊ देण्याऐवजी रस्त्यावर नष्ट केला. दूध रस्त्यावर ओतलं. भाजीपाला रस्त्यावर ट्रकखाली चिरडला. वरवर पाहता तरी शेतकरी कोणत्याही राजकीय पक्षाच्या झेंड्याखाली संघटीत नाही. शेतमालाला चांगला बाजारभाव मिळावा ही कित्येक वर्ष जुनीच मागणी शेतकरी करत होता. यंदा तुरीचं भरपूर पीक आलं पण एक तर तुरीला भाव मिळाला नाही आणि सरकारनं चांगल्या भावानं तूर खरेदी केली नाही. शेतकऱ्याचा उत्पादन खर्चही भरून निघाला नाही.

भाजप आणि सरकार म्हणताय की त्यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. शेतकऱ्याला भाव देण्यासाठी बोलणी करायला सरकार तयार आहे. कर्जमाफीची शेतकऱ्याची मागणी मात्र सरकार मंजूर करायला तयार नाही. भाजप आणि सरकारचं म्हणणं आहे की शेतकऱ्यांचा संप काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं उचकवला आहे.

समजा दोन्ही काँग्रेसनी संप उचकवला असेल तर त्यात त्यांचं काही चुकलं असं नाही. विरोधी पक्ष या नात्यानं सत्ताधारी पक्षाला अडचणीत आणणं हे कर्तव्यच ते पार पाडत आहेत. भाजपही गेली तीसेक वर्ष विरोधी पक्ष या नात्यानं काँग्रेसच्या सरकारांच्या विरोधात आंदोलनं करतच होता.

वरवर पाहता  शेतकरी आंदोलन राजकीय पक्षानं चालवलं आहे असं दिसत नाही. या आधी मराठा आंदोलन झालं तेही राजकीय पक्षांनी उचकवलं होतं असे आरोप झाला होता. प्रत्यक्षात तसं आढळून आलं नाही. हळूहळू ते आंदोलन विरत गेलं.

शेतकरी आंदोलनांमुळं भाजपचं सरकार आणि पक्ष दोन्ही अडचणीत आले आहेत. राज्यातली तीसेक टक्केपेक्षा जास्त माणसं जर संपाचं हत्यार उचलणार असतील तर त्याचा अर्थ सरकार धोक्यात आलं आहे. शिवसेना भाजपला त्रास देण्याच्या पवित्र्यात आहेत. त्यामुळे शिवसेना व दोन्ही काँग्रेस पक्षांनी शेतकऱ्यांचा असंतोष वापरायचा ठरवलं तर सरकार अडचणीत येईल. शक्यता अशी आहे की भाजप या आंदोलनाचा राजकीय फायदा घेऊन पोटनिवडणुकीचाही निर्णय घेईल. त्यामुळं सरकार कदाचित शेतकऱ्यांच्या विरोधात जनमत संघटित करण्याचा प्रयत्न करेल. सोशल मिडियामध्ये भाजपभक्तांनी शेतकऱ्यांवर हल्ले करायला सुरुवात केलीच आहे. शहरी मध्यमवर्ग हा भाजपचा समर्थक वर्ग आहे. दूध आणि भाज्या गुजरात व अन्य प्रांतातून आणून सरकार शेतकरी आंदोलनात फूट पाडू शकेल. आंदोलन चिरडू शकेल. मध्यम वर्ग, उच्च वर्ग सरकारला या प्रयत्नात पाठिंबा देईल. शेतकऱ्यांची जिरवली पाहिजे असं भाजप भक्त सोशल मिडियात म्हणत आहेत ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

भाजप अनेक वाटांनी  शेतकऱ्यांचं आंदोलन थोपवू शकेल. चिरडू शकेल. वाटाघाटीच्या घोळात नेऊन आंदोलन थंड पाडू शकेल. संपकरी शेतकरी हा एकसंध शेतकरी नाही. ना वर्गाच्या हिशोबात ना जातीच्या, लहान मध्यम, श्रीमंत, कोरडवाहू, बागायती असेही अनेक गट शेतकऱ्यांमध्ये आहेत. शेतकरी समाजातल्या या विविध गटांचा फायदा आजवर राजकीय पक्षांनी घेतला. त्यामुळे शेतकरी त्यांचे प्रश्न कधीही धसाला लावू शकला नाही. आजही परिस्थितीत फरक नसल्याने

आंदोलन निष्प्रभ होण्याची भावना नाकारता येणार नाही.

शेती हा व्यवसाय परवडणारा राहिलेला नाही. काळाच्या ओघात शेतकरी आणि शेतमाल या दोन्हीचं महत्त्व आणि समाजाच्या गरजांच्या हिशोबातलं प्रमाण कमी कमी होत जात आहे. पुढंही तेच घडणार आहे. शेती ही गोष्ट परवडणार नाही. शेतीवर फार माणसं अवलंबून राहू शकणार नाहीत. शेती आणि खेडं या दोन्ही गोष्टी दिवसेंदिवस अस्तंगत होण्याची फार शक्यता आहे. शेतीचा आकार, शेतीवर अवबलूंन असणारी माणसं हे दोन घटक पाहता आहे या स्थितीत शेती किफायतशीर होण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्याचं भलं करायचं असेल तर त्याला शेतीबाहेर जायची परवानगी असायला हवी. त्याला शेतीबाहेर काढायला हवं. फार कमी माणसं फार मोठ्या जमिनीचा व्यवहार सांभाळतील अशाच दिशेनं जायला हवं. एक तर शेतकरीच कमी उरतील आणि जे उरतील त्यांनाही एक सामाजिक जबाबदारी म्हणून सांभाळून घेणं याच दिशेनं अर्थ व्यवस्था उभारावी लागेल.

शेतकऱ्याला शेतीबाहेर काढण्यासाठी एकूण अर्थव्यवस्था खूपच गतीमान करून रोजगार वाढवावे लागतील आणि त्यात शेतकऱ्यांना सामावून घ्यायला हवं. परंतु स्थिती अशी आहे की देशात कोणताच राजकीय पक्ष गतीमान आर्थिक विकासाची धोरणं आखू शकत नाही, अमलात आणू शकत नाही. तसा अर्थविचार राजकीय पक्षांजवळ नाही. उद्योग आणि सेवा क्षेत्रं गतिमान करून, निर्यात वाढवून दहा ते अकरा टक्के या दरानं विकास करता आला तरच शेतकऱ्याला शेतीतर बाहेर काढता येईल. परंतु देशातले उद्योग व कामगार विषयक कायदे आणि नियंत्रण औद्योगिक विकासाला पोषक नाहीत. त्यात भरीस भर म्हणजे भ्रष्टाचार, राजकीय पक्ष पूर्णपणे भ्रष्टाचारावर आधारलेलं असल्याने कायद्यातल्या त्रुटी आणि अत्यंत सदोष नोकरशाही यांचा वापर राजकीय पक्ष सत्तेत येण्यासाठी सत्ता टिकवण्यासाठी करतात. त्यामुळे योग्य कायदे करणं आणि ते अमलात आणणं या योन्ही गोष्टीत राजकीय पक्षांना रस नाही. घोषणाबाजी, आपल्या अपयशांना इतरांना दोषी ठरवणं ही दोन हत्यारं वापरून राजकीय पक्ष सत्ता काबीज करतात.

स्वातंत्र्य मिळालं तेव्हा काँग्रेस म्हणाले की ब्रिटिशांनी तिजोरी रिकामी करून ठेवल्यामुळे त्यांना विकास करण्यात अडचणी आल्या. आता भाजप म्हणतंय की काँग्रेसनं आजवर करून ठेवलेल्या उद्योगामुळें त्यांना प्रश्न सोडवता येत नाहीयेत. काँग्रेस असो की भाजप, दोघेही मूळ आर्थिक प्रश्नांना हात घालायला तयार नाहीयेत. महाराष्ट्रातलं सरकार असो की केंद्रातलं, दोन्हीही सरकारं आधीच्या सरकारांच्याच योजना त्यात किरकोळ बदल करून योजनांची नाव बदलून अमलात आणत आहेत. पाणी अडवणं, शिवारात पाणी जिरवणं या योजना अजिबातच नव्या नाहीत. गेली कित्येक वर्षे त्या अमलात आणल्या गेल्या आहेत. पण त्यामुळे शेतकऱ्यांचं भलं झालेलं दिसत नाही. त्याला चांगलं जगायचं आहे, शेतीत अडकवून समाज त्याला सतत टांगतं ठेवण्याच्या प्रयत्नात आहे. शेतकरी या टांगतेपणातून बाहेर पडायच्या प्रयत्नात आहे. त्यामुळेच संप झाला आहे.

शेतीत जगता येत नाही म्हटल्यावर शेतकऱ्यानं करावं तरी काय. आत्महत्या या वाटेनं शेतकरी गेला. त्याचा उपयोग झाला नाही. आता तो आंदोलनात उतरला आहे. स्वत:च्या उपयोगापुरतं धान्य शेतमाल पिकवायचा आणि अधिक शेतीमाल गावाबाहेर जाऊ द्यायचा नाही असा पवित्रा शेतकऱ्यानं घेतला आहे. एका परीनं हा फार अव्यवहारी असा मार्ग आहे. शेतकऱ्याला लागणाऱ्या शेतमालाव्यतिरिक्त गरजांची कोंडी शहरी लोकांनी केली तर काय करणार. भाजपचा एकूण पवित्रा पहाता ते क्रूरपणानं वागण्याची शक्यता नाकारता येत नाही. गोमांस प्रकरणी ते कसे वागत आहेत ते समाज पहातो आहे. महाराष्ट्रातला शेतकरी गाय भाकड झाल्यावर, तिला पोसणं परवडत नाही

तेव्हा खाटकाला विकत असतो. त्याचं गायीवर प्रेम जरूर असतं, तो गायीची पूजाही करत असतो परंतू एकूण शेतीव्यवहाराचा विचार करता परिस्थितीत तो गाय खाटकाकडं पाठवत असतो. सरकारचा एकूण खाक्या पहाता आता शेतकरी गाय पाळणं सोडूनच देण्याची शक्यता आहे. गाय नाही म्हणजे बैलही नाही. कशी होणार शेती. परंतू हा हिशोब भाजपमधल्या लोकांना कळत नाही. यातून शेतकरी आणि शेती दोन्ही गोष्टी नाहिशा होण्याची शक्यता त्याना दिसत नाही. समजा एकूण गाय आणि बैल केवळ भावनात्मक-धार्मिक कारणांसाठी जगवायचे असं भाजपचं धोरण असेल तर तसं म्हणावं आणि सरळ यांत्रिक शेतीकडं जावं. पण यांत्रिक शेती म्हटल्यावर शेतीबाबतचा एकूण विचारच एक वेगळी दिशा घेतो. चार दोन एकरांची शेती यांत्रिक करता येत नसते. त्याही दिशेनं भाजप विचार करतंय असं दिसत नाही. एकूणात भाजप आर्थिकतेपेक्षा भावना-धर्म-संस्कृती या बाजूनच जास्त जाताना दिसतो. तेही समजण्यासारखं आहे. त्यामुळंच जर त्यांना मत मिळत असतील तर त्यांनी आर्थिक बिर्थिक भानगडीत जाण्याची गरजही नाही.

एकूणात असं दिसतय की शेतकरी हा प्रश्न राजकीय झाला आहे, तो आर्थिक उरलेला नाही. शेतकऱ्यांची मतं कशी मिळतील या दिशेनंच राजकीय पक्ष विचार करताना दिसतात. त्यामुळं सिद्धांत वगैरे गोष्टी आता केवळ पीएच.डी.च्या अभ्यासापुरत्याच शिल्लक राहिल्या आहेत. समाजात एखाद्या वर्गाचं शोषण होत असेल तर ते दूर करण्यासाठी कशा प्रकारची व्यवस्था असावी असा विचार एकेकाळी विचारवंत मांडत होते. मार्क्स त्यापैकी एक. त्यानं बाजार, भांडवलशाही नष्ट करण्याचा उपाय सांगितला. शरद जोशींनी मार्क्सच्याबरोबर दुसऱ्या बाजूची भूमिका मांडली. मुक्त अर्थव्यवस्थेमुळंच शोषित झालेल्या शेतकऱ्यांचा प्रश्न सुटेल असं ते मांडत होते. शेतकऱ्यावरची बंधनं काढून घ्या, त्याला वेठीस धरणं सोडा, त्याचे निर्णय त्याला घेऊ द्या, त्याच्यावर उपकार करू नका असं ते सांगत होते. जमीन आणि शेतमालाची किमत या दोन्ही गोष्टी शेतकऱ्याच्या हातात भारतीय राज्यघटनेनं ठेवलेल्या नाहीत. समाजाचं, ग्राहकाचं हित डोळ्यासमोर ठेवून जमीन आणि शेतीमाल विषयक कायदे सरकार करत गेलं. जमीन हा शेतकऱ्याच्या मालकीचा विषय घटनेच्या नवव्या परिशिष्टात टाकला.

मार्क्स असो की शरद जोशी, काही सैद्धांतिक विचार ते मांडत होते. त्या विचारांच्या आधारावर व्यवस्था उभारली जावी असा समाजाचा प्रयत्न असायला हवा. गंमत अशी की मार्क्सच्या पाठिराख्यांनी लोकशाही नावाच्या गोष्टीची ऐशी की तैशी केली आणि मार्क्सवादी व्यवस्था फेल गेल्या. जोशी तो मुक्त बाजारवाद मांडत होते त्याचा वापर अमेरिकेतला धनिकांनी अशा रीतीनं केला की एक टक्का श्रीमंत होत गेला, नव्व्याणव टक्के रस्त्यावर आले. अमेरिकेतल्या लोकशाही व्यवस्थेनं बाजारवादाचे तीनतेरा वाजवले.

भारतातली लोकशाहीची आणखीनच नवी तऱ्हा. इथे सिद्धांत वगैरे उरलेलेच नाहीत. जात, धर्म, भाषा, संस्कृती, विविध वर्ग यांच्यातल्या तणावांचा वापर करून राजकीय पक्ष निवडून येतात. निवडून येणं आणि सत्ता टिकवणं यामध्ये तत्त्व आणि सिद्धांतांचा संबंध नसतो हे भारतीय लोकशाहीनं आता जगाला शिकवलं आहे.

अशा स्थितीत शेतकऱ्यांचं काय होणार?

भाजप म्हणतंय की ते शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करणार. कसं करणार ते पटेल अशा तऱ्हेनं सांगता येत नाही. किरकोळ योजना आणि अर्थव्यवस्थेची जाचक चौकट यामध्ये शेतकऱ्यांचं भलं होण्याची शक्यता दिसत नाही. भाजपला पुढली साठेक वर्षं सत्ता द्या आणि वाट पहा असा एकूण पवित्रा दिसतो. पूर्वीच्या सरकारांची अपयश तर आहेतच. पण मूळ प्रश्न उरतोच, शेतकऱ्यांचं काय करायचं. हा प्रश्न अनिर्णित ठेवूनच जातील तेवढी वर्षं जाऊन द्यायची असा एकूण खाक्या दिसतोय.

# श्रीमंत माने

## संकलन - सकाळ (मिडीया)

महाराष्ट्रातला शेतकरी संप नुसताच ऐतिहासिक नाही तर तो भविष्यातल्या ग्रामीण-शहरी संघर्षाची चुणूक दाकवणाराही आहे. विशेषत: संपाच्या पहिल्या दिवशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपकऱ्यांवर तुटून पडलेले शहरी विद्वान अन् त्यांना त्याच भाषेत उत्तर देणारी शेतकऱ्यांची शिकली-सवरलेली मुलं यांच्यातल्या युद्धानं ती चुणूक अधोरेखित केलीय. निनावी, खोट्या नावांचे, तटस्थतेचा बुरखा चढवलेले अन्य बहुतेक सगळेच विद्वत्तेचा आव आणणारे, अशांना आपण ''सायबर चाचे' म्हणून संप सुरू होताच. अन्नदात्याला चिडवत होते, चेष्टा करत होते अन् त्यातून ग्रामीण शहरी शेतकरी मध्यमवर्गीयांमधली दरी वाढू पाहत होती. संपकऱ्यांवरील या ''सोशल'' हल्ल्यानं सत्ताधाऱ्यांच्या समर्थकांना सुरुवातीला गुदगुल्या झाल्या, पण हे फार काही चाललं नाही. दिल्लीत जंतरमंतरवर अगदी मलमुत्र प्राशनाचं आंदोलन करणारे तमिळनाडूचे शेतकरी प्रौढ, वृद्धत्वाकडे झुकलेले होते. महाराष्ट्रातल्या शेतकरी संपाचं तसं नाही. संपाचं नेतृत्व शेती व तिचं अर्थकारण, व्यवस्थेनं लादलेला अन्याय समजणाऱ्या तरुण पोरांकडे आहे. आंदोलनाचा चेहरा तरुण आहे.

त्याशिवाय सोशल मिडियावर शेतकऱ्यांच्या तरुण पोरांची मोठी फळी सक्रिय आहे. नव्या माध्यमांचं तंत्र त्यांना अवगत आहे. त्यांनी बुद्धिभेदाचे प्रयत्न, फेसबुकी अपप्रचार उधळून लावला. ''अरेला कारे' म्हणण्याचं धाडस दाखवलं. ''फार्मर्सस्ट्राईक', शेतकरी संपावर हे हॅशटॅग ट्विटरवर ट्रेंडिंगमध्ये राहिले. ''तुमचे सल्ले मेडिकलवाल्यांना, डॉक्टरांना किंवा बँकवाल्यांना द्या, शेतकऱ्यांचा नाद करू नका. जे नांगर चालवू शकतात ते तलवार चालवतीलच. नव्हे निम्मे वर्ष शेतात व निम्मे रणांगणात, ही आमची परंपरा असल्याचं ठणकावणाऱ्या पोस्ट व्हाटस्‌ॲपवर टाकल्या. ''बहिऱ्यांना ऐकू जावं असं वाटत असेल तर आवाज मोठा लागतो.'' हे भगतसिंगाचे उद्‌गार टीकाकारांना ऐकवले, कुणी उपाशी राहावं म्हणून नाही तर भविष्यात शेतकरी उपाशी राहू नये म्हणून संप असल्याचं स्पष्ट केलं.

आंदोलकांनी पहिल्याच दिवशी ओतून दिलेले दुधाचे टँकर, रस्त्यावर फेकून दिलेला भाजीपाला, रहदारीच्या चाकांखाली चेंदामेंदा झालेली फळफळावळं, टमाटरच्या लाल रंगात न्हाऊन निघालेल्या वाटा पाहून शहरांमधल्या मंडळींना दु:खाचे उमाळे दाटून आले होते. ''अन्न हे पूर्णब्रह्म वगैरे सांगत'' हे शेतकरी असूच शकत नाही. अशी प्रमाणपत्र दिली जात होती. पण याआधी भाव न मिळाल्यानं टोमॅटोचा झालेला लाल चिखल, जनावरांना खाऊ घालाव्या लागलेल्या मेथी कोथिंबिरीच्या जुड्या, बांधावर फेकलेल्या बटाटाच्या राशी, उभ्या पिकांमध्ये सोडावी लागलेली जितराबं अन् जाळावं लागलेलं कांद्याचं पीक, उपटून फेकलेल्या डाळिंबाच्या बागा कधी शहरी विद्वानांना दिसल्या नाहीत. तेव्हा कुठं गेला होता तुमचा पूर्णब्रह्मचा धर्म या प्रतिप्रश्नांच उत्तर तेव्हा कोणाकडेच नव्हतं. शेतमालाच्या नासाडीचं काय बोलता, अखखी जिनगानीची नासाडी झाली. झाडाला लटकलेले मृतदेह, विहिरीत तरंगणारी कृश शरीरं अन् स्वत:च चिता रचून त्यावर झोकून देणारे अभागी जीव, विहिरीवरच्या मोटारीच्या तारा हातात धरून केलेला आत्मघात यावर ही आपली व्यवस्था कधी बोलली नाही. तो साचलेला

आक्रोश आता संपाच्या निमित्तानं बाहेर पडलाय. त्यासाठी तसंच संपाचं संघटन, समर्थनासाठी वापरला जाणारा सोशल मीडिया हे या ऐतिहासिक घटनेचं खास वैशिष्ट्य आहे.

**चार दिवस बळीराजासाठी**

अर्थात, आंदोलकांना दिलासा देणारंही बरंच काही आहे. शहरांमधले सगळेच संपावर टिका करणारे नाहीत. मातीशी नात्याची आठवण देत इतरांच्या मध्यमवर्गीय जाणिवांना आवाहन करणारे खूप लोक आहेत. चार दिवस त्रास सहन करण्याची त्यांची तयारी आहे. शेती शेतकऱ्यांचं महत्त्व, अन्नदात्याच्या ऋणाची त्यांना जाणीव आहे. भलेही असे संप किंवा अन्य आंदोलनांचे या वर्गांचे नियम व संकेत वेगळे असोत, डॉक्टर संपावर जातात तेव्हा आजारी लेकराला दवाखान्याच्या पायरीवरून परत नेण्याची वेळ शेतकऱ्यावर येते. महसूल खात्याचे कर्मचारी संपावर जातात तेव्हा सातबारा उतारा न घेताच घरी जावं लागतं. बँकाचे लोक संपावर जातात तेव्हा खात्यात पैसे असून रिकाम्या हातानं परतावं लागतं. शिक्षक संपावर जातात तेव्हा बंद शाळांकडे पाहून चुकचुकण्यापलीकडे हातात काही नसतं. मग शेतकरी संपावर जाताच इतक्या ''मिरच्या का झोंबल्या'' असा तर्कशुद्ध प्रश्न विचारणारे खरेतर फक्त रहायला शहरांमध्ये आहेत. ग्रामीण व्यथा वेदनांच्या जाणिवांमधून हा तर्क पुढे आलाय.

**सिलिंग (१) पक्षपात करणारा कायदा**

बिगर शेतकऱ्यांना कितीही मालमत्ता बाळगता येते. शेतकऱ्यांवर मात्र सिलिंगचे निर्बंध.

कोरडवाहू असाल तर ५४ एकरपेक्षा जास्त जमीन बाळगता येत नाही. असा हा कायदा आहे.

१ कोटी रुपये एकरी भाव धरला तरी ५४ एकराचे ५४ कोटी होतात. (आज ५४ एकराचे मालक दुर्मिळ झाले आहेत.) या उलट अंबानीची मालमत्ता कित्येक लाख कोटींची आहे. ती त्यांना खुशाल बाळगता येते!

घटनेनुसार कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. त्या तत्त्वाला सिलिंगचा कायदा बाधा आणतो. म्हणूनच तो चलाखीने परिशिष्ट ९ मध्ये टाकून न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आला.

**सिलिंग (२) जमिनीवर नाही, केवळ शेतजमिनीवर आहे.**

सिलिंगचा कायदा उठला तर ''भांडवलदार' येतील व शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतील अशी एक भाबडी समजूत आहे की ही समजूत तपासून घेण्यासाठी हे लक्षात घ्यायला हवे की,

सिलिंगचा कायदा हा केवळ शेतजमिनीसाठी लागू होतो. जमिनीसाठी नाही. तथाकथित भांडवलदारांना आजही कोणाचीही व कितीही जमीन विकत घेण्यास मज्जाव नाही. अनेक कारखानदाराकडे आजही हजारो एकर जमीन आहे. कोणालाही कितीही जमीन घेता येते फक्त शेतीसाठी मनाई आहे. शेतीसाठी कमाल मर्यादा ओलांडता येत नाही. तात्पर्य एवढेच की, सिलिंगचा कायदा फक्त शेतीला असल्यामुळे जमिनी विकत घेण्यास आजही इतरांना मोकळीक आहे. सिलिंग उठल्याने ती मोकळीक मिळेल असे म्हणणे निव्वळ भाबडेपणाचे आहे.

**सिलिंग (३) भांडवल गुंतवणुकीला अडथळा आपल्या देशात सरासरी होल्डिंग आता एक हेक्टरच्या आत आहे. ८५ टक्के शेतकरी अल्प भूधारक ओहेत. शेती व्यवस्थेचे हे वास्तव भीषण आहे.**

एकर दोन एकरच्या खातेदाराला भांडवल सोपवून कोणीच व्यवहारी गुंतवणूकदार धोका पत्करणार नाही. शेतीमध्ये भांडवल गुतंवणूक वाढवायची असेल तर शेतीची ही विखंडीत रचना बदलावी लागेल. हजार दोन हजार एकर क्षेत्रावर काम करणाऱ्या कंपन्या तयार झाल्या तर त्यांना भांडवल गुंतवणूक करायला देशी,

विदेशी, खाजगी, सरकारी संस्था किंवा बँका तयार होतील. शेतीची रचना व बदलत्या भांडवल गुंतवणूकीची अपेक्षा करणे निरर्थक आहे.

खरे तर सरकार शेतकऱ्यांच्या प्रोड्युसर्स कंपन्याना प्रोत्साहन देत आहे. या कंपन्या शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत. या कंपन्या आज निविष्ठा आणि विक्री या दोन क्षेत्रात काम करतात. शेती मात्र ज्याने त्याने करायची असते. या कंपन्याना शेती करण्याचा अधिकार मिळाला तर त्या अधिक कल्पक व परिणामकारक रितीने काम करू शकतील. त्यासाठी सिलिंगच्या कायद्यात एक बदल करावा लागेल. सरकार, कृषी महामंडळ व कृषक्ष विद्यापीठ यांना सिलिंगच्या कायद्यातून वगळले आहे. त्याचप्रमाणे शेतकरी कंपन्यांना वगळावे. ही छोटी दुरुस्ती करावी. जमिनीच्या बाजार किमती एवढा खातेदाराचा भाग मानावा व कंपनीकडे असलेल्या जमिनीच्या प्रमाणात कंपनीला भांडवल उपलब्ध करून द्यावे. अशा प्रकारे शेतीमध्ये भांडवल गुंतवणूक करणे शक्य होईल.

मुद्दा एवढाच आहे की शेतीमध्ये भांडवल गुंतवणूक वाढवायची असेल तर सिलिंगच्या कायद्याचा अडथळा दूर करावा लागेल.

**सिलिंग (४) जमीन फेरवाटपाचे गौडबंगाल**

स्वातंत्र्याची पहाट होत असताना जमिनीच्या फेरवाटपाची मागणी पुढे आली. भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात यासाठी कमाल जमीन धारणा ठरवण्याचा आग्रह सुरू झाला. भूमिहिनांना जमिनी देण्यासाठी शेतकऱ्यांकडून जमिनी काढून घेणे आवश्यक होते का? मला वाटते नाही. त्यावेळेस सरकारी नोकरांच्या मालकीच्या सगळ्या जमिनी काढून घेऊन देखील वाटता आल्या असत्या. तुम्हाला नोकरी आहे ना मग जमीन कशाला? असा प्रश्न विचारता आला असता. परंतु तशी मागणी ना डाव्यांनी केली ना उजव्यांनी केली. एक जात सगळे शेतकऱ्यांवर तुटून पडले. सरकारने कर्मचाऱ्यांच्या जमिनी अबाधित ठेवल्या व केवळ शेतकऱ्यांच्या जमिनी तेवढ्या काढून घेतल्या. मर्यादेपेक्षा जास्त असलेली जमीन काढून घेताना त्यांना मोबदलाही दिला नाही. हा सरळ सरळ मुलभूत अधिकारावर केलेला हल्ला होता.

भारतात वतनदारी आणि सावकारी यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी काही लोकांनी लुबाडल्या होत्या. त्या त्यांच्याकडून काढून त्यांच्या मूळ मालकांना देणे न्यायाला धरून होते. त्यासाठी सिलिंगच्या कायद्याची आवश्यकता नव्हती. विशेष न्यायालये नियुक्त करून दहा वर्षांत सगळी प्रकरणे निपटता आली असती. पण सरकारने तो मार्ग पत्करला नाही.

शेतकरी हे देशातील समान नागरिक नाहीत असे समजून सिलिंगचा कायदा अमलात आणला असे म्हणायला भरपूर जागा आहे.

**सिलिंग (५) मूळ घटनेची मान्यता नसलेला कायदा**

सरकारने सिलींगचा कायदा आणला. तोपर्यंत स्वतंत्र भारताची पहिली निवडणूक झालेली नव्हती. म्हणजे हंगामी सरकार कार्यरत होते. त्याने हा मोठा निर्णय केला. बिहारचे लोक सिलिंग कायद्याविरुद्ध न्यायालयात गेले. हा कायदा भारताच्या संविधानाला धरून नाही असे सांगून न्यायालयाने हा कायदा बेकायदेशीर ठरवून रद्द केला. सरकार अस्वस्थ झाले. त्यांनी नवी शक्कल काढली. मूळ संविधानात नसलेले परिशिष्ट नऊ जोडण्यात आले. या परिशिष्टात टाकलेल्या कायद्याविरुद्ध न्यायालयात जाता येणार नाही अशी घटना दुरुस्ती करून घेतली. यात टाकलेला पहिला कायदा सिलिंगचा. आता शेतकऱ्याकडे कोणताच उपाय राहिला नाही. शेतकऱ्यांचे हातपाय बांधून टाकण्यात आले. सिलिंगचा कायदा राज्याचा आहे. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळी मर्यादा ठरवली गेली. महाराष्ट्रात कोरडवाहू शेतजमीन ५४ एकर व बागायत १८ एकर

अशी मर्यादा घालण्यात आली. शेतकऱ्यांना ह्यापेक्षा जास्त जमिनी ठेवता येत नाहीत. ही मर्यादा केवळ शेतकऱ्यावर लादण्यात आली. हा कायदा सरसकट जमीन धारणेचा कायदा नाही. तो केवळ शेत जमीन धारणेचा आहे. १९८५ साली शहरी जमीन धारणा कायदा आला होता. परंतु सरकारने नंतर तो रद्द केला. तुम्ही शेती करणार नसाल तर कितीही जमीन बाळगू शकता पण शेती करणार असाल तर मात्र त्यावर मर्यादा. असा हा मूळ संविधानाच्या तत्त्वांशी विसंगत असलेला कायदा आहे.

**सिलिंग (६) २ एकर कोरडवाहू जमिनीवर जगून दाखवा.**

महाराष्ट्रासह अनेक राज्यात सिलिंगच्या कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली. खरेतर शेतजमीनधारणेचा हा कायदा पक्षपाती होता. शेतकऱ्याने किती मालमत्ता धारण करावी हे तुम्ही ठरवले पण उद्योगासाठी तशी कोणतीही मर्यादा लागू केली नाही. दुसऱ्या कोणत्या व्यवसायाला लागू केली नाही. मग शेतीलाच का? असा प्रश्न शेतकऱ्याच्या तथाकथित सत्ताधारी सुपूत्रांना पडला नाही. दिल्लीची ताबेदारी करण्यात त्यांनी धन्यता मानली.

परिणाम काय झाला? चोपन्न एकरवाल्या शेतकऱ्याला चार मुले झाली. त्यांच्या वाटण्या झाल्या. प्रत्येकी साडेतेरा एकर आले. दुसऱ्या पिढीत त्यांना चार मुले झाली. त्यांच्यात वाटण्या झाल्या व ते अल्पभूधारक झाले. शेतीमध्ये बचत राहू दिली गेली नाही. प्रगतीची महत्त्वाकांक्षा मारून टाकली व शेतीच्याबाहेर रोजगार निघाले नाहीत. शेतीवर भार वाढत गेला वा शेतीचे लहान लहान तुकडे पडत गेले. आज ८५ टक्के खातेदार अल्पभूधारक झाले आहेत.

सत्तरच्या दशकापासून जगभर जमिनींच्या मालकीचे आकार वाढत आहेत. भारतात मात्र आकार लहान लहान होत आहेत. याचा अर्थ जगात जमिनीच्या मोठ्या तुकड्यावर कमी लोकांचा उदरनिर्वाह होतो आणि भारतात छोट्या तुकड्यावर जास्त लोकांना जगावे लागते.

दोन एकरचा शेतकरी कितीही पिकले व आजच्यापेक्षा दुप्पट भाव मिळाला तरी माणसासारखे (किमान चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसारखे) जीवन जगू शकत नाही. ही परिस्थिती असेल तर सिलिंगच्या उपलब्धीचा आपण फेरविचार केला पाहिजे. शेतीच्या पुनर्रचनेशिवाय आता शेतकऱ्यांना वेठबिगारीतून सोडवता येणार नाही.

अहो, सिलिंग उठवल्यावर शेती कोण करेल. त्या शेतकऱ्याचे कसे होईल? वगैरे असे प्रश्न विचारणाऱ्या एका प्राध्यापकाला मी एवढेच म्हणालो की नोकरी सोडून तू २ एकर कोरडवाहू जमिनीवर मला जगून दाखव.

ज्यांना शेतकरी गुलाम रहावे, त्यांच्या जीवनमानात सुधारणा होऊ नये असे वाटते, ते शेतकऱ्यांच्या बाजूने मोठ्याने गळा काढत आहेत. कायदा बदलायचा विषय आला की फाटे फोडतात. हे किसानपुत्रांनी समजून घ्यावे.

**सिलिंग (७) निरर्थक भीतीचा बागलबुवा**

बडे भांडवलदार येऊन गोरगरिब शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावतील मग हा गरीब शेतकरी भूमिहीन होऊन भुकेकंगाल होतील असा प्रचार बिगर शेतकरी बुद्धिवंतांकडून केला जातो. तो प्रचार अज्ञानावर आधारित आणि फसवा आहे.

ज्या देशात शेत जमिनीवर सीलिंग नाही तेथे असे काही घडले का? याचा शोध घेतला तर तसे अजिबात घडलेले दिसत नाही.

ज्या भांडवलदारांची भीती दाखवली जाते त्यांना या देशात आजही जमीन खरेदी करणे, बाळगणे, उपभोग घेणे, विकणे यास कोणताच मज्जाव नाही. शिवाय जमीन अधिग्रहण करून सरकार स्वत: त्यांना

जमिनी बहाल करत आले आहेत.

आम्ही सिलिंग उठवा म्हणत असताना अधिग्रहणाच्या अधिकाराचा वापर करून खाजगी उद्योगपतींना जमिनी देण्यास सरकारला रोखले पाहिजे अशी मागणी केली आहे. त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या कंपन्यांवरचे सिलिंग उठवून सुरुवात करावी असेही आम्ही सुचवले आहे.

सिलिंग उठले तर जमिनीचा बाजार खुला होईल. ज्याला शेतीतून बाहेर पडायचे आहे त्याला भांडवल घेऊन बाहेर पडता येईल व ज्याला चांगली शेती करायची आहे त्याला शेती करता येईल शेती सक्तीचा विषय न राहता निवडीचा विषय होईल. पुस्तकी पंडितांना सिलिंग उठला की पुन्हा जुन्या काळातील जमीनदारी पद्धत येईल अशी भीती वाटते. अशा शहाण्यांची कीव केलेलीच बरी. जग बदललेले त्यांच्या गावीच नाही. आपल्योपक्षा वाईट जमीनदारी पद्धत अमेरिकेत होती. आज त्या देशात सिलिंग नाही. तेथे जमीनदारी आली का? शेतीपेक्षा जास्त नफा देणारे अनेक उद्योग असताना कोणीही व्यवहारी माणूस शेतीकडे आकर्षित होत नाही. उद्योगपती, भांडवलदार शेतीकडे आकर्षित होत नाहीत म्हणून शेती करणाऱ्यांना त्या देशातील सरकारे आजही मोठी अनुदाने देताना दिसतात.

निरर्थक भीतीचा बागुलबुवा दाखविण्याचे दिवस संपले आहेत, हे अजून आमच्या मित्रांना कळलेले नसले तरी शेतकरी आणि नव्या पिढीतील किसानपुत्र त्यास भीक घालीत नाहीत.

**स्वामिनाथन आयोग म्हणजे काय?**

हरित क्रांतीचे जनक मा.डॉ.एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन सरकारने १८ नोव्हेंबर २००४ रोजी राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना शेती व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी या आयोगाची रचना करण्यात आली. आयोगाने २००६ पर्यंत एकूण ६ अहवाल सादर केले. शेवटचा अहवाल ४ ऑक्टोबर २००६ रोजी सादर करत आयोगाने शेतकऱ्यांच्या दूरावस्थेची कारणे व त्यावर उपाय सुचवले. खेदात्मक बाब ही की दुसऱ्या दिवशी म्हणजे ५ ऑक्टोबर ला सरकारने कर्मचाऱ्यासाठी सहावा वेतन आयोगाची स्थापना करून २००८ मध्ये शिफारशी लागू केल्या. अजून यात भर म्हणजे सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी पण सरकार लागू करायच्या तयारीत आहे. आणि जवळपास १० वर्षे होऊनसुद्धा स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी धूळ खात पडलेल्या आहेत.

**आयोगाच्या अहवालातील काही शिफारशी**

१) शेतकऱ्यांचे खर्च वजा जाऊन उत्पन्न सरकारी कर्मचाऱ्याप्रमाणे असावे.

२) शेतमालाचा हमीभाव उत्पादन खर्च वगळता ५०% असावा.

३) शेतमालाची आधारभूत किंमत लागू करण्याची पद्धत सुधारून गहू आणि इतर खाद्यान्न वगळता इतर पिकांना आधारभूत किंमत मिळायची व्यवस्था करावी.

४) बाजाराच्या चढउतारापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे म्हणून मूल्य स्थिरता निधीची स्थापना करावी.

५) आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतीच्या दुष्पपरिणामापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी इतर देशामधून येणाऱ्या शेतमालाला आयात कर लावावा.

६) दुष्काळ व इतर आपत्तीपासून बचावासाठी कृषी आपत्काल निधी'ची स्थापना करावी.

७) कृषी पतपुरवठा प्रणालीचा विस्तार करावा.

८) पिक कर्जावरील व्याजाचा दर कमी करावा.

९) हलाखीची स्थिती असलेल्या क्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्ती वेळी, पूर्वस्थिती येईपर्यंत गैरस्थानिक कर्जासहित सर्व कर्जाची वसुली स्थगित करून त्यावरील व्याज माफ करावे.

१०) संपूर्ण देशातील सर्व पिकांना कमीत कमी हप्त्यावर विमा संरक्षण मिळेल अशा रितीने पिक विमा

योजनेचा विस्तार व ग्रामीण विमा विकास निधीची स्थापना करावी.

११) पिकांच्या नुकसानीचे मूल्यमापन करत असताना ब्लॉकच्या ऐवजी गाव हा घटक वापरून विमा संरक्षण द्यावे.

१२) सामाजिक सुरक्षेचे जाळे निर्माण करून त्या अंतर्गत शेतकऱ्यांसाठी वृद्धावस्थेत आधार तसेच स्वास्थ्य विम्याची तरतूद करावी.

१३) परवडणाऱ्या दरात बी-बियाणे व इतर यंत्रसामुग्री उपलब्ध करून द्यावी.

१४) संपूर्ण देशात प्रगत शेती व माती परीक्षण प्रयोगशाळेचे संचालन.

१५) शेतीला कायम आणि सम प्रमाणात सिंचन आणि वीजपुरवठा व सिंचन व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणाव्यात.

**शेतकरी कर भरत नाही???**

दरडोई करमुक्त उत्पन्न ३ लाख रुपये आहे. सर्व खर्च जाऊन व्यवसायात ३ लाखापेक्षा जास्त रुपये राहिले तर कर भरायचा असतो.

शेतकऱ्याच्या घरातली कमीत कमी चार माणसं शेतात काम करतात.

म्हणजे त्या कुटुंबाचे उत्पन्न ३ लाख × ४ माणसं = १२ लाख, म्हणजे १२ लाखाच्या वर उत्पन्न गेले तर कर बसेल...

प्रॉविडेंट फंडमध्ये 80C नुसार १.५ लाख रुपये भरता येतात, ४ माणसं × १.५ लाख म्हणजे ६ लाख... १२ लाख + ६ लाख = १८ लाख उत्पन्न हे करमुक्त असेल.

यात होम लोन वगैरे पकडलं नाही...

इनकम टैक्स कायद्याच्या नियमाप्रमाणे एकदा व्यवसायात तोटा झाला की तो ८ वर्षे पुढे तो नेता येतो. म्हणजे तो तोटा संपेपर्यंत कर भरायचा नसतो. उदा. या वर्षी ६ लाख नुकसान झालं तर पुढच्या वर्षाच्या फायद्यातून तो वजा होईल.

शेतकऱ्याला आयुष्यात सलग किती सीझनला फायदा होतो? आणि किती सिझनला तोटा? माहीत आहे का?

व्यवसायासाठी घेतलेली जागा, वाहने यांच्यावर घसारा मिळतो.

आपल्याच शेतजमिनीवर उत्पादन घेत राहण्याचा घसारा शेतकऱ्यांना मिळेल का?

रंगरंगोटी, नवीन फर्निचर, दुरुस्ती इ. खर्च व्यावसायिक करतो आणि करात सुट मिळते.

मग दरवर्षी खत घालणे, उन्हाळ्यात जमिनी तापाव्या म्हणून नांगरून ठेवणे यावर पण करातून सुट मिळाली पाहिजे.

घरातल्या माणसांचा २४ तास, मरेपर्यंत पगार मोजला तर अंदाजे किती रुपये मिळाले तर करपात्र उत्पन्न दिसेल...?

चार माणसं राबली आणि ५० लाख जरी उत्पन्न झाले तरी टैक्स बसणार नाही... पेट्रोल, खाणेपिने, घरातील इतर सामान खरेदीची, चारधाम यात्रेची बिलं पण जोडले जातील ते तुम्ही लावता.

बाकी सगळे कर व्हॅट, एकसाईज, पट्ट्या शेतकरी भरतोच आणि कुणाला माहीत नसलेला ऊस खरेदी कर पण साखर कारखाने भरतात...

आधीचे सरकार मूर्ख नव्हते, त्यांना हे सर्व माहिती आहे, मूर्ख लोक अभ्यास न करता बोलतात... किती व्यापारी, डॉक्टर, वकील, इंजिनियर, सी.ए. इ. रोखीने आलेल्या पेशांवर १००% कर भरतात...?

कोण कुठं चोऱ्या करतो आणि कशा करतो हे आम्हाला माहीत नाही का?

बापाला कर कायदा शिकवू नका

शेतकरी संप चालूच राहील.

**(संकलन : सकाळ व सोशल मिडिया)**

# तलाक

## विलास सोनावने

मुस्लिम समाजाला पेचात पकडण्याची एकही संधी सोडायची नाही असा संकल्प मोदींच्या संघप्रणीत भाटांनी सोडलेला आहे.त्याचं ताजं उदाहरण म्हणजे तलाकच्या प्रश्नांची त्यांनी सुरू केलेली चर्चा आहे.

खरं म्हणजे सगळ्या धर्मातल्या त्रिवर्णाची लग्न पद्धती व बहुजन, दलित, उत्पादक जातीतील लग्नपद्धती तसेच देशातील ८०० च्या आसपास असलेल्या भटक्या विमुक्त जातीतील लग्न पद्धती, घटस्फोट, काडीमोड, फारकत इत्यादी वेगवेगळे आहेत. त्रिवर्गातलं लग्न हेच संस्कार मानले जातात आणि तेच पाळण्याचे बंधन बाईवर असते. म्हणून द्रौपदीचा अपवाद सोडला तर आपल्याकडे सगळ्या त्रिवर्णातल्या लग्न झालेल्या स्त्रिया पतिव्रता मानल्या गेलेल्या आहेत. त्यामुळेच ज्याच्याशी संस्कार म्हणून लग्न झालेलं आहे तो पुरुष मेला की बायकांना दोनच पर्याय होते १) सती जाणे २) स्वत:ला विद्रूप (केशवपन) करून राहाणे. त्यामुळे आजही राजस्थानमध्ये सतीचे देऊळ आहे आणि संघपरिवारातले लोक सतीचा उदोउदो करताना दिसतात. याला मुस्लिम त्रिवर्णातले लोक अपवाद नव्हते.

कुराणाने मुस्लिम पुरुषांना एका वेळेला चार बायका असण्याची परवानगी दिलेली होती. मुमताज शहाजहानची चौदावी बेगम होती. चंद्रगुप्त मौर्यापासून ते छत्रपती शिवाजीपर्यंत बहुपत्नीत्व हा भारतातील शिरस्ता होता. राज्यकर्त्या जमाती जिंकलेल्या राज्यांच्या राज्यकर्त्या मुलींशी राजकीय सोयीसाठी लग्न करत तर उत्पादक जातीतील पुरुष त्यांच्या उत्पादनामध्ये, उत्पादक कामात मदत होईल म्हणून एकापेक्षा जास्त स्त्रियांशी लग्न करत.

आपल्याकडे दशरथला चार बायका होत्या. तिथपासून पेशवाईच्या काळात बायको/बायका अधिक नाटकशाळा अधिक बावन्नखणी इत्यादी प्रकार अस्तित्वात होतेच.

इंग्रज आल्यानंतर त्यांनी जी इंग्लिश शिक्षित पिढी तयार केली त्या इंग्लिश शिक्षित पिढीने युरोपातील ख्रिस्ती संस्कृतीचे अनुकरण करत सतीविरोधी कायदा करण्याचा आग्रह इंग्रज राज्यकर्त्यांकडे धरला. इंग्रजांना आपण कसे स्त्रियांचे कैवारी आहोत आणि भारतीय समाज, राज्यकर्ता वर्ग हा कसा स्त्रियांच्या बाबतीत जुलमी आहे हे सिद्ध करायचे होतेच. त्यामुळे त्यांनी राजरामोहन रॉय, प्रभुतीचा आग्रह मान्य करत द्विभार्या प्रतिबंध कायदा केला. आज सतीचे गोडवे गाणारे संघपरिवारातले लोक सगळे हिंदू कसे पुरोगामी आहेत यासाठी ही उदाहरणे देत असतात.

वर्तमान काळात द्विभार्या प्रतिबंधक कायद्याच्या अंलमबजावणीची काय परिस्थिती आहे? भारतातील उपलब्ध असलेले सगळे 'जनगणना अहवाल असे सांगतात की, एका पेक्षा जास्त बायका असण्याचं प्रमाण जैनांमध्ये सगळ्यात वरचे आहे. त्यानंतर हिंदूतील उच्चवर्णीय जातीत आहे. त्यानंतर आदिवासींचं आहे. त्यानंतर बौद्ध किंवा हिंदू दलितांचं आहे. सगळ्यात शेवटी मुसलमानांचा नंबर येतो. विश्व हिंदू परिषदेचा एक नेता प्रविण तोगडियाँ हा जैन आहे. जैन धर्मांमध्ये एकापेक्षा जास्त बायका असण्याचे हे जे प्रमाण आहे त्याच्या विरोधात त्याने एकदाही आवाज उठवला नाही.

१९९० नंतर शहरीकरणाचा वेग वाढला. जमिनीला किंमत आली. महाराष्ट्रामध्ये तसेच देशामध्ये

शेतकरी जातींमध्ये, जमिनी विकून श्रीमंत झालेल्या नवश्रीमतांचा एक वर्ग तयार झालेला आहे. महाराष्ट्रात आपण त्यांना 'गुंठामंत्री' म्हणतो. या गुंठामंत्री वर्गाला पैसे आल्याबराबेर त्याने बायको हेमामालिनीसारखी नाही किंवा रेखासारखी नाही म्हणून कुठलीही कायदेशीर सोपस्कार न करता त्यांना टाकून दिलेले आहे. अशा टाकून दिलेल्या परित्यक्त्या स्त्रियांची संख्या ९० नंतर कित्येक पटींनी वाढली आहे. हा नवश्रीमंत वर्ग संघपरिवाराचा नवा सामाजिक आधार आहे. या हिंदू परित्यक्त्या स्त्रियांच्या संख्यावर संघपरिवार चर्चा करत नाही.

तलाक पिडीत स्त्रियांचा प्रश्न 'मुस्लिम सत्यशोधक समाज' या संघटनेने कळीचा प्रश्न केला. संस्कारांनी सगळ्या कम्युनिस्ट पक्षाच्या ब्राह्मणी नेतृत्वाने व समाजवादाच्या ब्राह्मणी नेतृत्वाने त्याला पाठिंबा दिला. म्हणजे सगळ्या पुरोगामी ब्राह्मणी नेतृत्वाने मिळून मुसलमानांच्या विरोधात संघाच्या हातात कोलीत दिलेले आहे. त्यामुळे या प्रश्नांनवर संघ नेतृत्व करताना जरी दिसत असला तरी काँग्रेससह सगळ्या पुरोगामी पक्षाच्या नेतृत्वाचा याला छुपा पाठिंबा असतोच.

संघाचे लोक मुस्लिम स्त्रियांची बाजू घेऊन पोटतिकडीने बोलत असतात तेव्हा त्यांनीच घडवलेल्या गुजरात सारख्या नरसंहारामध्ये प्रचंड प्रमाणात बलात्कार झालेल्या मुस्लिम स्त्रियांबद्दल त्यांनी सोयीस्कर मौन पाळलेले असते.

प्रश्न काय आहे? जगातल्या मुस्लिमेतर धर्मातली लग्न जन्माला येण्याच्या आधीच ठरलेली असतात. जन्माला आल्यानंतर लग्नाचा संस्कार केला जातो. त्यामुळे कायद्याने घटस्फोट झाला तरी धर्म त्याला घटस्फोट मानतच नाही.

मुस्लिम कायद्यानुसार हा एका वयात आलेल्या स्त्रीने-पुरुषाने एकमेकांसोबत त्याच आपसात पटेल तितके दिवस एकत्र राहण्याचा करार म्हणजे मुस्लिम लग्न आहे. दोघांपैकी एकाही पार्टीला तो करार जर जाचक वाटला तर करार मोडण्याची परवानगी आहे. स्त्रीने जर करार मोडायचा असेल तर त्याला खुला घेणे असे म्हणतात. ज्या काझीने लग्न लावले तो जर खुला घेण्याच्या कारणाशी सहमत असेल तर दोन साक्षीदारांच्या मदतीने खुला देऊ शकतो.

पुरुषाला जर करारातून बाहेर पडायचं असेल तर त्यालाच तलाक म्हणतात. इस्लामी कायद्यानुसार तलाक, तीन टप्प्यात देता येतो. पहिल्यांदा तलाक हा शब्द उच्चारल्यानंतर दोघांमध्ये दिलजमाई झाली तर पहिला तलाक रद्द होतो. तसे न झाल्यास ती नोटीस आहे त्याची दखल घेऊन दोघांनी योग्य कारवाई केली नाही तर तिसरा तलाक दिला जातो. तिसरा तलाक संबंध विच्छेद.

सगळ्याच धर्मावर पुरुषांनी व पुरुषसत्तेने कब्जा केलेला असल्यामुळे पुरुष आपापल्या सोयीनुसार कायद्याचा अर्थ लावत असतात. मुस्लिम पुरुषही याबाबतीत सोयीस्करपणे इस्लामी कायद्याचा स्वत:च्या फायद्याप्रमाणे वापर करत असतात. पण तरीसुद्धा मुस्लिम पुरुष बायकोला सोडत असताना तिला सांगत असतो, मी तुला सोडतोय म्हणून! तिला न सांगता टाकून देत नाही.

मूळ प्रश्न धर्माच्या चौकटीच्या बाहेर जाऊन स्त्री पुरुष नातं नागरी समाजाच्या मानवी समाजाच्या अखत्यारित आणण्याच्या आहे. जोपर्यंत असं घडत नाही तोपर्यंत पुरुष एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी धर्माच्या नावाने स्त्रियांचा वापर करत रहाणार!

**विलास सोनावणे**

# पवित्र कुरआनने फक्त पुरुषांनाच नाही तर स्त्रीयांनाही दिले आहेत अनेक अधिकार, परंतु... ?

**चाँद शेख**

सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या एका याचिकेवर झालेली सुनवाई आणि भारत सरकारकडून न्यायालयात आपले म्हणणे सादर केल्या नंतर तीन तलाकचा मुद्दा संपूर्ण देशात पुन्हा एकदा चर्चीला जात आहे. या देशव्यापी वादामध्ये जवळपास सर्व मुल्ला, मौलवी आपल्या तर्कानुसार तीन तलाकच्या वर्तमान व्यवस्थेच्या समर्थनात उभे असल्याचे चित्र आज तरी दिसत आहे आणि सरकार व्यतिरिक्त मुस्लिमांचा खूप थोडासा भाग तलाकच्या वर्तमान व्यवस्थेविरुद्ध उभा असलेला दिसतो. मी शरीयतचा किंवा इस्लामिक धर्माचा जानकार नाही परंतु पवित्र कुरआन चे अध्ययन केले आहे त्या आधारावर म्हणू शकतो की तीन तलाकची वर्तमान व्यवस्था पवित्र कुरआनच्या मार्गदर्शनाच्या विरुद्ध आणि गैर-इस्लामिक आहे.

वास्तविक पाहता कुरआनने स्त्रियांचा गौरव, सन्मान आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे खूप सारे प्रावधान दिले आहे. तलाक संदर्भातही इतके कठोर नियम आहेत की पत्नीला तलाक देताना पतीला शंभर वेळा विचार करावा लागेल. पवित्र कुरआनमध्ये तलाक हे न करण्यालायक काम आहे असे संबोधून तलाकच्या प्रक्रियेला खूप कठीण केले आहे. ज्या प्रक्रियेत पती, पत्नीच्या नात्याला शेवटच्या क्षणापर्यंत वाचविण्याचे प्रयत्न केले असल्याचे दिसून येते. पती-पत्नी मधील संवाद, दोन परिवारामध्ये चर्चा, सल्लामसलत आणि समेट घडवून आणण्याचे प्रयत्न हे तलाकच्या प्रक्रियेचे अविभाज्य भाग आहेत. या प्रक्रियेला टाळून कोणीही तलाक देऊ शकत नाही. आणि तसा तलाक दिला तर तो तलाक शरीयत संमत असत नाही.

सूरह निसाचे अनुसार पत्नी बेजबाबदार असेल उद्धट असेल तर तिला समजावून सांगा तिची चूक तिच्या लक्षात आणून द्या आणि हे सर्व विन्रमतेने व प्रेमाने सांगाना ना की रागाने आदळआपट करून. तसेच पती बेजबाबदार असेल उद्धट असेल तर पत्नीचेदेखील कर्तव्य आहे की तिने संयमाने घ्यावे. पतीला समजावून सांगावे, घराला वाचविण्यासाठी एक दुसऱ्यांच्या अवगुणाकडे दुर्लक्ष करून गुणांचा विचार करत कोणत्याही परिस्थिती घराला वाचविण्याचेच प्रयत्न झाले पाहिजेत. या उपरांत पती, पत्नीचे सर्वच प्रयत्न विफल झाले असतील तरीही तलाक देण्याची घाई न करता दोन्ही कुटुंबातील एका-एका कर्ता व्यक्तीने मध्यस्थी होऊन मध्य मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एवढेच नाही या व्यतिरिक्त आणखी प्रयत्न करून देखील पती-पत्नी मधील मतभेद मिटले नाहीत तरच त्यांना विभक्त होण्याची मुभा आहे.

पवित्र कुरआनचे असे स्पष्ट मार्गदर्शन असताना देखील मला हे समजत नाही की तीन तलाकचा वर्तमान नियम त्यांना उर्वरित आयुष्यात विनाधार एकाकी सोडून देतो. स्वावलंबी स्त्रिया आपल्या प्रयत्नाने या यातनेतून उभ्या राहू शकतीलही परंतु ज्या स्त्रीया केवळ आपल्या पतीवरच अवलंबून आहेत, मुले आहेत त्यांचे आयुष्य तलाक नंतर किती कठीण होत असेल याचा कधी कोणी तलाक देत असताना विचार करत असेल काय?

काही लोक तलाकनंतर पत्नीला मिळणाऱ्या मेहर (विवाह होते वेळे पतीकडून पत्नीला सर्व संमतीने घोषित केलेली रक्कम)चा रकमेचा हवाला देऊन सांगतात की तलाक पिडीत महिला आपले उर्वरित आयुष्य या मेहरच्या रकमेने गुजराण करेल. वास्तविक पाहता मेहरची रकम इतकी तुटपुंजी असते की त्या तलाक पिडीताचे आयुष्य काय काही महिनेदेखील गुजराण होणे शक्य होणार नाही. कथित इस्लामी विद्ववानाकडून तीन तलाक लागू करताना निश्चितपणे काही तरी चूक झाली आहे. पवित्र कुरआनच्या या संदर्भातील आयतांची व्याख्या करताना गफलत झाली आहे आणि मला वाटते हे पुरुषी मानसिकतेतून, पुरुषी दृष्टीकोनातून असे झाले असावे. मुस्लिमांचे सर्व धर्मगुरु, सर्व मुल्ला मौलवी पुरुष वर्गातूनच येतात. स्त्रीयांना तेथे कोणतेही प्रतिनिधित्व नाही हे देखील एक कारण असावे.

हे खरे आहे की तलाकची वर्तमानपद्धती खूप सोपी आणि एकतर्फी असूनदेखील देशातील मुस्लिम समाजामध्ये तलाकचे प्रमाण खूप कमी आहे. जवळ जवळ ०.५ (फक्त अर्धा टक्का). शिक्षित तथा जागरूक मुस्लिम तीन तलाकचा प्रयोग कदाचितच करत असतील. तलाकचे प्रचलन अशिक्षित तसेच मुल्ला मौलवींच्या प्रभावाखाली असणाऱ्या मध्येच जास्त असल्याचे दिसून येते. तलाक-तलाक-तलाक हे बहुतांश क्षणिक रागात आणि भावनेच्या भरात ज्यादा उच्चारले जातात.

तेव्हा एकाच वेळी तीन तलाकची पद्धत वर्तमान काळात अप्रासंगिकच नाही तर पवित्र कुरआनच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या विपरित आहे. अशा प्रकारे एकाच वेळी तीन तलाक उच्चारून आयुष्यभराचे नाते असे एकतर्फी तोडण्याचे कोणीही कोणत्याही प्रकारे समर्थन करणार नाही. याची जाणीव या तर्कट मुल्ला मौलवीने ठेवली पाहिजे. जर का निकाह (लग्न) मुला मुलींच्या होकाराने होत असेल तर मग तलाकच का असा एकतर्फी? तलाक देताना का मुलीच्या मर्जीचा विचार केला जात नाही. निकाह (लग्न) सर्व संमतीने सर्वांसमक्ष होतो तर मग तलाक असा एकांतात का? याचे देखील समाधानकारक उत्तर तलाक पिडीतांना हवं आहे. गेला तो काळ, लोकशाहीत जगत आहोत आम्ही, शरीयतच्या नावाखाली असे मुस्लिम स्त्रीयांचे दमन शांतीचा संदेश देणाऱ्या इस्लामला मारक ठरत आहे. जगातील बहुतांश मुस्लिम देशाने तलाकची प्रथा बंद केली आहे. मग आपल्याच देशात तलाकची तर्कहीन पद्धत का?

तसे पाहता ही समाधानाची बाब आहे की तीन तलाकच्या वर्तमान पद्धतीत सुधार आणण्यासाठी किंबहुना ही प्रथा बंद करण्यासाठी मुस्लिम महिलामधूनच नाहीतर मुस्लिम पुरुषामधून देखील आवाज उठू लागला आहे. खूप साऱ्या महिलांनी आपल्या अधिकारांसाठी सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली आहे. प्रसिद्धी माध्यमासमोर देखील आपली बाजू ठामपणे मांडत आहेत. मात्र तरीही सद्यस्थितीला प्रतिरोधाचा हा स्वर खूप प्रखर तथा व्यापक नाही. परंतु मुस्लिम समाजामध्ये जस जशी जागरूकता वाढेल तसतसा अशा प्रथेविरुद्ध देखील आवाज वाढेल हे निश्चित.

शेवटी मला वाटत सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्या आदेशाची वाट न पाहता देशातील इस्लामिक विद्वानांनी, कुरआन शरियात कायद्याच्या जाणकारांनी तसेच मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या अधिकाऱ्यांची बदलत्या काळाबरोबर मुस्लिम स्त्रियांप्रती संवेदनशीलता दाखवावी व पवित्र कुरआनच्या पवित्र प्रकाशात तीन तलाकच्या भेदभावपूर्ण पद्धतीत व्यापक संशोधन करावे शक्य झाल्यास ही पद्धती बंद करावी तरच मुस्लिम स्त्रीयांमध्ये सुरक्षित जीवन जगण्याचा आत्मविश्वास निर्माण होईल आणि देशाला आणि जगालाही भारतीय मुस्लिमांचा एक सकारात्मक संदेश जाईल.

# माणसांचा धर्म कि धर्माची माणसे

## ओंकार महाजन

हे एक सुंदर सत्य आहे की आपण जन्म:तच नास्तिक आहोत, धर्म हा शिकवला जातो किंवा शिकता येतो म्हणजे धर्म ही संकल्पना नैसर्गिक नसून कृत्रीम आहे. मग प्रश्न असा पडतो की जी संकल्पना कृत्रीम आहे अशा संकल्पनेशी आपले एक अभासी विश्व (virtul world) निर्माण करून राहण्यात काय अर्थ आहे. इथे ह्या धार्मिक विश्वात मनुष्य दगडातला देव शोधण्याचा प्रयत्न करतोय पण तो माणसातला देव कधी शोधणार या विवंचनेने नास्तिकता झुंज देते.

हा कसला धर्म आहे जो माणसाला, माणसाचे रक्त मागतोय, मनुष्याला मनुष्यामध्ये भेद करण्यास शिकवतोय याला आपण धर्म म्हणून कसे स्वीकारू शकतोय, संत कबीर म्हणतात की, जर दगडामध्ये देव असता तर मी पूर्ण पर्वत पुजले असते, याचा अर्थ दगडामध्ये देव शोधायला लावणारा धर्म हा धर्म नसून काही लोकांची पोळी भाजून घेण्याचे साधन झालंय, जो शनी (शनी देव, शनीशिंगणापूर घटना) स्त्रीच्या स्पर्शाने अशुद्ध होतोय, बाटतोय, तो मग नेमका कोणाच्या गर्भातून जन्मास आला हाच मूळ प्रश्न पडतोय.

काही दिवसाआधी कोल्हापूरच्या लक्ष्मी देवालयातल्या गाभाऱ्यामध्ये स्त्रियांना जाण्यास मनाई होती आणि त्याचे कारण होते ''मासिक पाळी'' (menstruation period) काही रूढीप्रिय स्वघोषित परंपरानिष्ठ लोकांनी म्हणजे उजवी विचारसरणी म्हणण्यापेक्षा कोणतीच विचारसरणी नसणाऱ्या लोकांनी त्या स्त्रियांना गाभाऱ्या जाण्यास मनाई केली. पण त्या स्वघोषित परंपरानिष्ठ अक्कलशून्य लोकांना हे ठाऊक नाही, की ज्या लक्ष्मीच्या गाभाऱ्यात तिचे वस्त्र बदलले जातात ते एका भटाकडून म्हणजे एका पुरुषाकडून बदलले जातात हे किती प्रमाणात बरोबर आहे.

धर्म जर सर्वांसाठी समान असेल तर भटाप्रमाणेच त्या देवालयात व गाभाऱ्यामध्ये स्त्रियांचे तीचे स्थान त्यांना का दिले जात नाही.

मासिक पाळी ह्यानेच जर देव बाटतो, दुषित होतो असा समज असेल तर कीव येते अशा मानसिकतेच्या लोकांवर, मासिक पाळी हेच कारण आहे या परंपरानिष्ठ स्वघोषित रूढीप्रिय लोकांना जन्म देण्यात, हे त्यांना ठाऊक आहे का?

धर्मच जर स्त्री-पुरुषमध्ये भेदभाव करण्यास शिकवतो त्या धर्माकडून दुसऱ्या काय अपेक्षा आपण करणार.

एका बाजूला नाशिकमध्ये २३०० कोटी खर्च करण्यात येतात. कुंभमेळ्यावरती जिथे न जाने किती महिन्यान्महिने त्या भटक्या फसव्या बुवांना अंघोळ करण्याकरिता यंत्रणा स्थापन करण्यात येते. पण दुसरीकडे त्याच नाशिकमध्ये हजारो महानगरपालिकांच्या शाळा (Govt schools) धुळीच्या, असाक्षरतेच्या भयानक अवस्थेतून जात आहे, जर ह्याच शाळेमध्ये आपल्या भारताचे भविष्य घडणार असेल तर भारताचे भविष्यातील चित्र नेमके काय असेल याची कल्पना आपण करूच शकता.

या देशामध्ये कित्येक देव व देवी आहेत. ज्या स्वत:ला सर्वशक्तीशाली समजतात. मग तरीसुद्धा या देशामध्ये गरिबी, वर्णभेद, रंगभेद, भ्रष्टाचार कसा काय फोफावतो हाच प्रश्न पडतोय.

अशा धर्मावरती किंवा देवावर विश्वास ठेवण्यात काय अर्थ आहे जो आज भुकेलेल्या, तहानलेल्या

मुलांना जेऊ घालू शकत नाही. आणि भविष्यामध्ये स्वर्गाची दारं उघडण्याची चेष्टा करतोय. भारत देश हा खूप धार्मिक आहे, जगामध्ये सर्वात जास्त धार्मिक लोक तुम्हाला भारतामध्ये सापडतील; पण तरीसुद्धा या देशामध्ये गरिबी, भुकमारी, आत्महत्या, बलात्कार, जातीभेद, चोरी या गोष्टींनी हा देश का ग्रासलेला आहे, केलात कधी विचार, मग करा!

आज आपण अशाच समस्येवरती लक्ष्य केंद्रित करतोय ज्याचा मानवतेच्या विकासाशी काहीही संबंध नाही, आपण भांडतोय दगडांसाठी, आपण भांडतोय आयोध्या व बाबरीसाठी, आपण जीव घेतोय निष्पाप मुला-मुलींचा धार्मिक कारणासाठी.

इथे गाईसाठी माणूस मारला जातो व निष्पाप समतेच्या तर्कशुद्ध व वैज्ञानिकदृष्टी कोणाचा प्रचार-प्रसार करणारे, दाभोळकर, पानसरे व कलबुर्गी यांना जीवानीशी मारले जाते. हे काय आताच घडतंय असं नाही, मागेही हेच घडलंय व आताही हेच घडतंय. धर्म व्यवस्थेचे हे व्यसन पुन्हा नव्याने इथे लोकांना जडतंय. क्रांतिकारी तुकारामांनी आपलं पूर्ण आयुष्य कर्मकांडाशी लढण्यात घालवलं, मग प्रश्न असा पडतोय की तोच क्रांतिकारी सदेह वैकुंठला कसा काय जातोय?

इथे ह्या अभासी धार्मिक विश्वामध्ये सर्वांना फक्त भेदभाव शिकवला जातो आणि हिरव्या, पिवळ्या, निळ्या, भगव्या झेंडाखाली माणूस माणूस वाटला जातो.

जो ईश्वर स्वत: आपल्या देवळामध्ये प्रकाश करू शकत नाही मग तो तुमच्या आमच्या आयुष्यामध्ये काय प्रकाश टाकणार, जो स्वत:च्या दक्षिणापेटीचे संरक्षण करू शकत नाही तो तुमचे-आमचे काय संरक्षण करणार? ईश्वर जर आहे तर तो क्रूर कार्य करणाऱ्याला, ते कार्य करण्याअगोदरच का थांबवत नाही, याने तर सर्वच अपराध टळतील.

आपले मित्र मंडळी, नातेवाईक धर्म स्थळांवर (हे विद्यार्थी आहेत.) वर्षातून किंवा महिन्यातून हजेरी लावतात. याचे कारण, त्यांना वाटते की त्यांच्या एका भेटीने त्यांच्या आयुष्यात पैशाची भरभराट, समस्येचे निवारण व आनंददायी क्षण येतील. पण असं जर असेल तर मग त्या धर्मस्थळांबाहेर बसणाऱ्या भिकाऱ्याची अवस्था का बदलत नाही जे २४ (चोवीस तास) १२ (महिने) त्याच धर्मस्थळांच्या पायथ्याशी पडून असतात?

आज आपण बघतोय आपला शेजारी देश आपल्या देशासोबत, आपल्या सैनिकांसोबत जे क्रूर काम करत आहे. त्याला कुठेतरी पूर्णविराम मिळाला पाहिजे.

यासाठी या देशातील सर्व साधू-संत-महात्मा, भट-मौलवी-फादर/पोप (chritianity) यांनी एकत्र येऊन शेजारी देशाच्या सीमेवरती जाऊन आपले सर्व तंत्र-मंत्र, जप-तप, शिल्य शाप देऊन ईश्वराची साधना करून ईश्वराद्वारे त्यांना भस्म करून एकदाचा हा प्रश्न संपुष्टात आणावा, जर असे संभव नसेल तर आपण भारतीय लोक ह्या फसव्या व दिशाभूल करणाऱ्या लोकांना कधी जाब विचारणार आहोत?

आप आपला कष्टकरी शेतकरी आपल्या जीवाचे रान करून बैलासारखे राबतोय तरीसुद्धा त्याच्यावरती आत्महत्या करण्याची वेळ येते, आता आपणच सांगा नवरात्रीला नऊ दिवस पायात चप्पल न घालण्याने जर आपली सर्व स्वप्ने, आशा, आकांक्षा जर पूर्ण होत असते तर मग भर उन्हामध्ये आपला शेतकरी आणवाणी पायाने २४ तास काम करतोय तरीसुद्धा त्याच्यावरती आत्महत्येची वेळ का बरं येते???

धर्म माणसाला एकतर असाहाय्य बनवतो किंवा आतंकवादी.

जे विचार तुम्हाला विचार करण्यासाठी भाग हेच त्यावरती नक्की विचार करा, कारण विश्व विचार आहे आणि विश्व हेच विचार... आणि जर विचार स्वातंत्र संपले तर हे विश्व त्याला अपवाद नसेल.

**ओंकार महाजन**

# रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग

*अंतर्बाह्य जन आणि मन*
*जीवाही आगोज पडती आघात ।।१।।*
*येउनिया नित्य नित्य करी*
*तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे ।।२।।*
*अवघियांचे काळें केले तोंड ।।३।।*

शेतकरी-कामगारांचे राज्य आणायचे आहे म्हणत संयुक्त महाराष्ट्राची लढाई लढविली गेली आणि दिल्लीश्वरांना आव्हान देत संयुक्त महाराष्ट्र उभा राहिला. वारकऱ्यांच्या भागवत धर्माचा आणि छ. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा ऐतिहासिक वारसा असलेल्या संयुक्त महाराष्ट्रात सत्तावन वर्षानंतरसुद्धा शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही, कर्जमुक्ती होत नाही म्हणून संपावर जावे लागते यापेक्षा शोकांतिका कोणतीच नाही. ''कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी'' अशी भूमिका घेत शेतकऱ्यांना आणि त्यांच्या श्रमाला सर्वात जास्त महत्त्व देणारे वारकऱ्यांचे संस्कार आणि ''शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावाल तर याद राखा'' अशा छ. शिवाजी महाराजांचा विचार महाराष्ट्रात दिवसाढवळ्या सरकारकडून पायदळी तुडवला जात आहे. ''बुडती ही जन, न पहावे डोळा, म्हणून कळवळा येत असे'' अशी संतश्रेष्ठ जगतगुरू तुकोबारायांची भूमिका घेत आपण वारकरी मंडळींनी शेतकऱ्यांच्या संदर्भात वारकरी-शेतकरी अशी ऐक्याची भूमिका घेतली पाहिजे असे आम्हांस वाटते.

पेरणीचा काळ लक्षात घेता सरकारने दिलेल्या आश्वासनावर विसंबून पेरणीची कामे आटोपून व आटोपत-आटोपत आपण पंढरीच्या वारीत सामील झालो आहोत. स्वातंत्र्यापूर्वी १८७५-७६ मध्ये झालेल्या सावकारशाही विरोधी महात्मा फुले यांच्या नेतृत्वात झालेल्या शेतकरी उठावा नंतर १९३० च्या दशकात डॉ. आंबेडकर आणि नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वात खोतीविरोधी चरीचा संप अशी मोठमोठी आंदोलने महाराष्ट्रात झाली होती आणि त्यामुळे शेतकऱ्याला मान, सन्मान आणि हक्क मिळत होता परंतू माघील काही वर्षांपासून सरकारच्या धोरणांमुळे आणि निसर्गाच्या चक्रामुळे पुन्हा सुलतानी आणि अस्मानी संकट शेतकऱ्यांवर आले आहे. तसेच काहीसे संकट डाउ या देशविघातक कंपनीच्या निमित्ताने महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी आले होते, त्यावेळी आपण वाकऱ्यांनी आपला निसर्ग, नदी आणि जंगल वाचवणारा वारसा सांगत त्या कंपनीला पळवून लावले. तसेच काहीसे शेतकऱ्यांच्या जमिनी घेणारे संकट समृद्धी महामार्गाच्या निमित्ताने महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. सध्या शेतकऱ्यांनी उभारलेला अभूतपूर्व लढा या मालिकेतील आहे. फडणवीस सरकारने सरसकट कर्जमाफीचे आश्वासन देत लाख रुपयापर्यंतचेच कर्ज माफ करण्याची घेतलेली भूमिका व पेरणीकरिता १०००० रुपयाचे नवे कर्जमाफीचे आश्वासन देताना जे जाचक निकष लावले आहे, त्याने शेतकरी बांधवाचा भ्रमनिरास केला असला तरी अस्मानी आणि सुलतानी अशी संकटाशी लढण्याचे बळ आम्हास पांडुरंग देवो म्हणीत आपण वारकरी-शेतकरी पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण करीत चालली आहोत व लढा जिंकेपर्यंत आपण मार्गस्थ असणार आहोत.

*हा तो नोहे कांही निराशेचा ठेवा ।*
*भले पोटीं वाव राखिलिया ।।१।।*
*विश्वंभरे विश्व समविले पोटीं ।*
*तेथेची शेवटीं आम्ही असो ।।२।।*
*नेणता चिंतन करिता अंतरी ।*
*तेथे अभ्यंतरी उमटेल ।।३।।*
*तुका म्हणे माझा स्वामी अबोलणा ।*
*पुरवू खुणे खूणा जाणतसे ।।४।।*

मागील काही वर्षांपासून शेतीचे संकट अधिक गंभीर झाले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या आधीच्या वर्षात शेतीकडे जे थोडेफार लक्ष सरकार कडून दिले जात होते, ते १९९१ पासून या देशात सुरू करण्यात आलेल्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणास या देशात सुरुवात करून तिला बाजाराच्या तोंडी देऊन सर्व पक्षीय आणि सर्व रंगीय सरकारने आई जेऊ देईना आणि बाप भिक मागू देईना या स्थितीस आणून सोडले आहे. सरकारी मदत नाही, बियाणे, खते-कीटकनाशक यावर बाजाराचा कब्जा, या वस्तुकरिता बँककर्ज घेण्यावाचून पर्याय नाही आणि त्यातही त्याची उपलब्धताही जेमतेमच. पुन्हा खाजगी सावकाराचे कर्ज घेण्यावाचून पर्याय राहिलेला नाही अशाही परिस्थितीत पिकविलं तर मालाला हमीभाव नाही. हातात येणाऱ्या रकमेत काय काय करायचं? कर्ज कसं फेडायचं? व्याज भरायचं? दैनंदिन गरजा भागवायच्या? मुलांना शिकवायचं? घरातली आजारपण निस्तरायची कशी? असे एक ना अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. ऐपत असणाऱ्या व २०-२० मजले घर बांधून ऐशोरामात जगणाऱ्या अदानी-अंबानीचे करोडो-अब्ज रुपयाचे कर्ज सरसकट माफ करणारे सरकार मात्र शेकऱ्यास त्याचे काही लाख कोटी रुपयाचे कर्ज माफ करीत नाही. त्याच्या मालास हमीभाव देत नाही व याकरिता त्याला संपासारखे याआधी न उपसलेले हत्यार उगारावे लागते ही आपल्या महाराष्ट्राला उद्विग्न करणारी परिस्थिती आहे आणि एवढे करूनही आश्वासन देऊन पाठीत खंजीर खुपसण्याचे काम सत्ताधारी वर्ग करतो आहे.

आपणच वर उल्लेख केल्याप्रमाणे काही वर्षापूर्वी शेती-पाण्यावर आक्रमण डाउ प्रकल्पास हाकलून लावले होते तर तिकडे हजारो एकर शेतजमिनी ताब्यात घेऊ पाहणाऱ्या अंबानीला रायगडच्या आगरी-शेतकरी बांधवानी हाकलून लावले होते. मागच्या वर्षभरात आपल्याकडे निघणाऱ्या मराठा मूक मोर्चाच्या मागण्यात दिसणारी शेतकरी संकटाची तीव्रता गंभीरपणे जाणवत होती. गुजरात, राजस्थान या राज्यात आरक्षणाच्या मागणीच्या आधाराने उभ्या राहणाऱ्या चळवळीच्या मुळात गंभीर होत जाणारे शेतीचे संकट आहे हे लक्षात घेतले तर समस्या किती गंभीर आहे हे समजून येईल. आधीच शेतीत न राहिलेला दम आणि त्यातही आपली पत खाली घातली गेलेली... शेतीकडे सरकार लक्ष घालणारच नाहीये अशी दिसणारी चिन्ह आहेत. जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. रियल इस्टेट जोरात आहे. जगभरात आजच्या घडीला मंदी आहे. बाहेरच्या उद्योगांना आपल्या देशात जमिनी देण्याकरिता मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्ग, मुंबई ते दिल्ली औद्योगिक कॉरिडोर याद्वारे मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया वगैरेच्या घोषणा देत शेतकऱ्याच्या जमिनी ताब्यात घ्यायला निघाले आहे. आम्ही पिकवलेली तूर विकत घ्यायला तयार नसलेले हे सरकार मात्र आमच्या जमिनी समृद्धी महामार्गाच्या नावाखाली घ्यायला साम-दाम-दंड-भेद असे सगळे उपाय आजमविन्याच्या तयारीत दिसते आहे. शेतकऱ्याच्या शेतजमिनी ताब्यात घेऊन कसली समृद्धी येणार आहे? नागपूर ते मुंबई अशी सलग शेतजमीन ताब्यात घेतली की शेतकरी उरतोच कुठे? शेतकऱ्यास समृद्ध करावयाचेच असेल तर मग संपूर्ण कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, शेतकऱ्याला

पेन्शन, शेतकऱ्याच्या मुलाच्या शिक्षणासाठीच्या सुविधा या मागण्यांचा सरकार का विचार करीत नाही हा प्रश्न आम्हास यानिमित्ताने उपस्थित करावयाचा आहे. सत्ताधारी वर्ग म्हणून सगळ्या रंगांची सत्ताधारी जमात एकत्र येऊन आमच्या हितावर घाला घालणार असेल तर वारकरी म्हणूनची आमची अस्मिता वाचविण्याकरिता नाठाळाच्या माथी काठी हानने हे आमचे कर्तव्यच ठरते...

*उदार तरी देऊ गांडीची लंगोटी ।*
*कुटिलाच्या काठी नाकीं देऊं ।।१।।*
*भले तरी आम्ही जगासी दाखऊ ।*
*दुर्जनासी होऊं काळ तैसे ।।२।।*
*भल्याचिया आम्ही कुटुंबास तारू ।*
*निंदकाचा संसारू पहावेना ।।३।।*
*तुका म्हणे आम्हा दया येते कांही ।*
*म्हणोनिया काही बोलतसें ।।४।।*

संपर्क :

विनोद भुजबळ - ९५०३४५८६०३३ (अहमदनगर), सुरेश सोमकुंवर - ९८२८२२१८२९ (नागपूर), रोहित बागुल - ९४०५१९६५४३ (धुळे), भूषण पवार - ७०२०४९५७४४ (सोलापूर), शशी सोनवणे - ८७९३६०६८३५ (वसई-विरार), सुनील चौधरी - ९६७३१२६४५० (नागपूर), दयानंद कनकदंडे - ९६३७९०१२०४ (नांदेड)

इमेल - bharatyuva@gmail.com, ब्लॉग - www.yuvabharat.wordpress.com

टीप - सदरील पत्रकातील अभंग हे समग्र तुकाराम गाथा, कै. तुकाराम तात्या पडवळ यांनी संपादित या ग्रंथातून घेतले आहेत.

मती मातीची,
गती पाण्याची,
सोपवली तू
वैऱ्याच्या हाती!
आपल रान
आपलं धान
त्याचं का आलं
लोकांना भान?
मोडून टाक
लबाडाचा डाव,
भक्ती-शक्तीचं
निशान लाव ।
तू रानचा राजा,
ऊन-पावसाला
तुझा तगादा ।
तुझं मातीच ज्ञान,
निसर्गाचं गान ।
आपलं शिवारं,
आपण राखू
साजूक चोरांना
गाडून टाकू ।
सोन्याचा तुकडा
डोळ्यात खुपतो
डाव रोज नवा
त्यांचा रे शिजतो.
विषारी दिमाग
जाळं बी विणतो.
हो सावध आता
आता नको फसू,
फासाचा दोर
जाळून टाकू।।
गरजापोटी

**– शोभा करांडे**

# वृत्तांत - किसान संसद - जिंद (हरियाणा)

## दयानंद कनकदंडे

उत्तर प्रदेशात सत्तेवर आलेल्या योगी सरकारने लाख रुपयांपर्यंतच्या शेतकर्जमाफीचा निर्णय जाहीर केला. त्यामागोमाग महाराष्ट्र, मध्यप्रदेश, हरियाणा या भाजपशाषित राज्यांमध्ये कर्जमाफीच्या मागणीने जोर धरायला सुरुवात केली. २०१४ साली केंद्रात व त्याच्यामागोमाग वरील राज्यांमध्ये भाजपने निवडून येताना शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन, स्वामीनाथन आयोग लागू करण्याचे आश्वासन दिलेले होते. मागील वर्षभरात, हरियाणात, राजस्थान येथे झालेले जाट आरक्षण आंदोलन, गुजरातमधील पटेल आंदोलन आणि महाराष्ट्रातील मराठा आरक्षण मागणीचे मोर्चे हे तत्कालीन विविध घटनांच्या प्रतिक्रियेत निघाले असले तरी मोर्चाच्या मागण्यामध्ये शेतकर्जमाफी, शेतमालाला हमीभाव, शेतीला प्राधान्य क्रम देण्याची मागणी इत्यादी गोष्टी प्रामुख्याने केंद्रस्थानी होत्या.

या वर्षी महाराष्ट्रात विक्रमी तूर उत्पादन झाले. उत्पादन विक्रमी झाले असले तरी सरकार तूर खरेदीला तयार नव्हते व मध्येच सरकारने हमी भावावर तूर खरेदी करणे थांबवले असल्याने त्या विरोधातील असंतोष कुठे स्वतंत्रपणे तर कुठे विरोधी पक्ष संघटनांच्या नेतृत्वाखाली संघटीत व्हायला सुरुवात झाली होती. अगदी त्यावेळेस देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या नागपूर-मुंबई, समृद्धी महामार्गाकरता तूर विकत घ्यायला तयार नसलेले सरकार जमिनी विकत घ्यायला मात्र पूर्ण तयारीनिशी सरसावलेले दिसत होते. या भूसंपादनाच्या विरोधात तिवसा (अमरावती) जुन्नर (नाशिक) शहापूर (ठाणे) येथील शेतकऱ्यांनी संघर्ष करावयास सुरुवात केली होती.

मुंबई ते दिल्ली असा महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान हरियाणा व दिल्ली या राज्यातून जाणारा औद्योगिक कॉरिडॉर उभारण्याचे काम गेल्या पाच-सहा वर्षापासून जोरात सुरू असून त्याकरिता शेतकरी, आदिवासी यांच्या जमिनींचे संपादन केले जात आहे. या विरोधात पालघर या आदिवासी पट्ट्यापासून ते जिंद हरियाणापर्यंत लोक संघर्ष करत आहेत. लोक-संघर्षात सामील असलेले, प्रकृति मानव (हरियाणा) केंद्रित जनआंदोलनातर्फे जिंद, हयिाणा जवळील नगुराँ या गावी 'किसान संसदेचे आयोजन वर्तमान कृषिसंकट आणि आपली भूमिका या विषयावर किसान संसदेचे आयोजन ३,४ जून २०१७ रोजी करण्यात आले होते.'

या किसान संसदेमध्ये शेतकरी नेते सुखदेवसिंग (पंजाब) मणिराम पुनिया (राजस्थान), गुरूनाम सिंग (हरियाणा), शशी सोनवणे (अध्यक्ष - आयसीटीयू), शोभा करांडे (सगुणा संघटना), जम्मू-काश्मिर येथील कार्यकर्ते रुपचंद मखनोत्रा, घनश्याम डेमोक्रॅट (राजस्थान), प्रकृति मानव हितैशी कृषी अभियानाचे संयोजक अरुण करांडे, उपसंयोजक मन्नाराम डांगी, युवा भारतचे संयोजक दयानंद कनकदंडे यांनी वर्तमान कृषीसंकट सरकारची साम्राज्यवादी धोरणे, जागतिक तापमानवाढीचा प्रश्न आणि स्त्रिया तसेच पर्यायी कृषी विकासाच्या दिशा काय असतील यावर आपली मते मांडली.

भारतातील शेती ही आजच्या घडीला अभूतपूर्व अशा संकटात सापडलेली आहे. विशेषत: १९९० नंतर शेती ही जागतिक बाजाराशी जोडली गेल्यानंतर शेती व शेतकरी दोघेही संकटात आहेत. बी-बियाणे, खते यावरची आत्मनिर्भरता संपुष्टात आणली गेली

आहे. हे क्षेत्र खुल्या बाजाराच्या तोंडी देण्यात आल्याने या वस्तू विकत घेण्याकरता शेतकऱ्याला कर्ज घेणे अपरिहार्य होत गेले, त्याने पिकवलेल्या शेतमालाला योग्य असा हमीभाव न मिळाल्याने व या क्षेत्रातून सरकारने हात काढून घेतल्याने खर्च आणि उत्पन्न याचे गणित विस्कटत गेले. यामुळे कर्जाच्या संकटात तो अधिकाधिक फसत गेला. जगभरात व आपल्या देशातही अंधाधुंद औद्योगिकरणाला दिले गेलेले महत्त्व, उद्योगाकरता शेतीचे पळवलेले पाणी, अतिरेकी औद्योगिकीकरणाचाच परिणाम असलेल्या जागतिक तापमान वाढीने एकूणच ऋतूचक्रावर केलेला परिणाम हेही घटक शेतीसंकट तीव्र होण्यास कारणीभूत ठरले.

गेल्या दहा-पंधरा वर्षात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत व हे सत्र आजही थांबलेले नाही. अशा स्थितीत गंभीर होत जाणाऱ्या कृषी संकटाची कारणे काय, हे समजून घेऊन सरकारने प्रकृती मानव हिताचे कृषीधोरण राबिवले पाहिजे. ज्यामध्ये शेतीकरताच एकूण बजेटच्या ५०% टक्के तरतूद करणे शेतकऱ्यांच्या पेन्शनसाठीची स्थायी व्यवस्था उभारणे, प्राकृतिक शेतीला प्रोत्साहन देणे, शेती उत्पादनाकरता सहकारी समित्यांच्या धर्तीवर बाजाराची उपलब्धता निर्माण करणे या व यासारख्या अनेक विषयांवर देशभरातील शेतकरी समूहांसोबत विचारमंथन घडवले पाहिजे, अशी भूमिका संसदेच्या सुरुवातीला शेतकरी नेते सुखदेव सिंग यांनी मांडली.

संपूर्ण जगभरात एकीकडे ग्लोबल वॉर्मिंग, पाणी, पर्यावरणाचे बिघडत जाणारे संतुलन याबद्दल चिंता व्यक्त केल्या जात आहेत. तर दुसरीकडे विनाशाकरता जबाबदार असलेल्या धोरणांना विकासाच्या नावाखाली सर्वसामान्यांच्यावरती थोपवून त्यातून कार्पोरेट व्यवस्था नफा कमवत चालली आहे. कष्टकरी जनतेच्या जीवनामध्ये या व्यवस्थेने टोकाची असुरक्षितता निर्माण केलेली आहे. शेती क्षेत्रातील असुरक्षिततेमुळेच एक-दोन नव्हे तर लाखो शेतकरी आत्महत्या करत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. मुंबईपासून ते दिल्लीपर्यंतच्या परिसरात असलेल्या मराठा, जाट, गुज्जर या एकेकाळी हरितक्रांतीच्या फायद्याने मुजोर झालेल्या शेतकरी जाती आज आरक्षण मागत आहेत. याच जातींनी मंडल आयोगाला विरोध केला होता.

(परिस्थिती आता बदललेली आहे. मधल्या २० वर्षाच्या काळात गंभीर होत जाणाऱ्या शेतीसंकटामुळे आणि जो आता दिल्ली ते मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर बनतो आहे, त्यामध्ये गेलेल्या जमिनीमुळे त्याची ही अवस्था आहे.) १५०० किमी. लांब असलेल्या या भागात ६ मोठी विमानतळे, २३ औद्योगिक केंद्रे, २ मोठ्या विद्युत परियोजना, २ बंदरं, ६ पदरी महार्गासोबतच मोदींच्या स्वप्नातील २४ स्मार्ट सिटी उभारण्याचा प्लॅन सुरू आहे. या करता लागणारी जमीन जर बघितली तर त्यामधील जी उपजाऊ शेतजमिन आहे ती नापिक बनून टाकेल. आज शेतीवर ५०-६०% लोकसंख्या अवलंबून आहे हे लक्षात घेतले तर कृषीक्षेत्रातील खूप मोठा रोजगार धोक्यात येणार आहे. उदयपूरपासून ते पालघरपर्यंतचे जंगल त्यातील प्राकृतिक संसाधने आणि तेथील आदिवासी जनता यांचे जीवनमानच धोक्यात आले आहे.

२००८ पासून जग आर्थिक मंदीतून जात आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे कमीतकमी श्रम आणि कमीत कमी वेळेमध्ये निसर्गाचे सर्वाधिक शोषण करून अधिक उत्पन्न शक्य झाले आहे. जास्त खरेदीदार नसल्यामुळे बाजारामध्ये उत्पादन मोठ्या प्रमाणात पडलेले आहे. रोज बनवून निर्यात करणे या नीतीला तसा काही अर्थ नाही अशावेळी विदेशी बाजारावरती कब्जा करण्याकरता आम्ही मेक इन इंडिया राबवित आहोत, असे म्हणणे मूर्खपणाचे आहे. डी.एम.आय.सी. मध्ये उत्पादन होईलच याची मला शक्यता वाटत नाही. मात्र या निमित्ताने पाणी, शेतजमिन आणि जंगले ही भांडवलदारांच्या

ताब्यात जातील व त्यामुळे करोडोच्या संख्येने असलेले शेतकरी, आदिवासी, दलित, महिला, छोटे दुकानदार, शेतमजूर इत्यादी देशोधडीला लागणार आहेत म्हणून आपण याविरोधात संघर्ष उभारण्याची गरज आहे. असे मत किसान संसदेच्या पहिल्या दिवशी झालेल्या चर्चेचा समारोप करताना कॉ. शशी सोनावणे यांनी मांडले.

संसदेच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात जागतिक तापमानवाढ आणि महिलांवरील प्रभाव, कृषिसंकट यावर शोभा करांडे यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा करण्यात आली. लैंगिक समतेच्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी कृषी आणि अन्य पायाभूत गोष्टींमध्ये गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. शेतीतील संकटाचा आणि विकासाच्या नावाखाली होणाऱ्या विस्थापनाचा सर्वाधिक फटका हा महिलांनाच बसतो. विस्थापनविरोधी आंदोलनांमध्ये लढणाऱ्या महिलांची संख्या जास्त दिसणे हे काही अपवादाने होत नाही. जागतिक तापमानवाढीचा वाईट परिणाम हा श्रीमंत देशापेक्षा आपल्यासारख्या गरिब देशांवर पडतो. गरिबीचा संबंध हा आरोग्य, मर्यादित आधारभूत सुधारणा आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांच्याशी असतो. म्हणून जागतिक तापमानवाढीचा दुष्परिणाम हा गरिबांवर जास्त होतो. यातही खराब वातावरणाचा परिणाम पुरुषांपेक्षा महिलांना जास्त भोगावा लागतो. सोबतच लैंगिक असमानताही वाढत जाते. बांग्लादेशामध्ये १९९१ मध्ये आलेल्या त्सुनामीमध्ये १ लाख ५० हजार लोक मारले गेले. त्यात ९०% महिला होत्या. आपल्याकडे महिलांना पाण्यात पोहू देण्याच्या असलेल्या सामाजिक नियंत्रणामुळे त्या पोहू शकत नव्हत्या. मलेरिया, टी.बी. या रोगांना महिलाच जास्त बळी पडतात असे जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे. विविध प्रकारच्या डासांचा प्रादुर्भाव व डांसापासून होणारे विविध रोग यांचा एक संबंध जागतिक तापमानवाढीशी आहे. अशी मते कनुप्रिया, अल्पना पूनिया यांनी मांडली.

कृषिसंकट हे संकट नसून ते षडयंत्र आहे. खूप पद्धतशीरपणे शेती व शेतकरी निकालात काढण्याचे नियोजन चालू आहे. जंगल-जमीन-पाणीसारखे नैसर्गिक स्रोत कब्जात घेण्यासाठी वेगवेगळे डाव आखले जात आहेत. जाती, धर्म, लिंग यानुसार माणसांचे वेगवेगळे गट करून त्यांना विभागलं जातंय जेणेकरून त्यांच शोषण करून त्यांचे हुकूमशाहीचे, स्वार्थी, पिळवणुकीचे, नियोजन यशस्वी होईल. या सगळ्यांचा नीट विचार करून योग्य पावले उचलायला हवीत, असे मत शोभाताई करांडे यांनी मांडले.

या सत्रानंतर प्रकृति मानव हितैशी कृषी अभियानाचे संयोजक अरुण करांडे यांच्या अध्यक्षतेखाली संघटनात्मक सत्र पार पडले. दोन दिवस झालेल्या चर्चेचा सारांश लक्षात घेत पुढील कृती कार्यक्रम ठरविण्यात आले. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, शेतमालाला हमी भाव, प्राकृतिक शेतीकरता स्वतंत्र निधींची तरतूद, प्राकृतिक शेतमालाकरता सहकार आधारित बाजारपेठांची निर्मिती आदी मागण्यांना घेऊन होणाऱ्या आंदोलनांमध्ये सहभागी होण्याबाबत आणि स्वतंत्रपणे आंदोलन करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

डी.एम.आय.सी. आणि अमृतसर-कोलकत्ता इंडस्ट्रियल कॉरिडॉर आय.सी. ला प्राणपणाने विरोध करण्याची भूमिका घेण्यात आली.

शेतकर्जमाफीच्या व अन्य प्रश्नांना घेऊन महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी पुकारलेल्या शेतकरी संप व महाराष्ट्र बंद आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करणारा ठराव करून किसान संसदेची सांगता झाली.

*ता. क. : आयटी क्षेत्रात कामगार कपात सुरू झाली असून आयटी क्षेत्रातील कामगारांनी केलेल्या एफ.आय.टी.ई. फोरम फॉर आयटी एम्प्लॉईजने या विरोधात लढण्याची घोषणा केली आहे. चेन्नई (तामिळनाडू) येथे १७,१८ जून २०१७ ला पार पडलेल्या परिषदेने शेतकरी संघर्षाला पाठिंबा देणारा ठराव पारीत केला आहे.*

*आम्ही कृषी संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांचा संघर्षासोबत सहृदयता व्यक्त करतो जे त्यांच्या मुलभूत गरजा तरी पूर्ण व्हाव्यात म्हणून लढत आहेत.*

# हा उत्सव अच्छे दिनाचा की मोदींचा

## दत्तकुमार खंडागळे

सध्या केंद्र सरकारच्यावतीने देशभरात मोदी उत्सव सुरू आहे. आज सांगलीत या उत्सवाला भेट दिली. तिथे गेलो तर सदरच्या ठिकाणी जादूचा खेळ चालू होता. तसेच लकी ड्राची कुपने लोकांना वाटण्यात येत होती. लोकांचा पैसा अशा पद्धतीने उधळण्यात येतोय याच खंत वाटली. सदरच्या ठिकाणी आठ-दहाच माणसंच उपस्थित होती. अन मंचकावर जादूच्या खेळाची करमणूक. हा योगायोग बरा वाटला. कारण मोदी पंतप्रधान म्हणून हेच करतायत. मग त्यांच्या नावाने सुरू असणाऱ्या उत्सवात जादूचा खेळ नसणे आश्चर्यकारक ठरले असते. केंद्र सरकारने विविध इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्यांना हे काम दिले आहे. या फालतूपणावर केंद्र सरकार कोट्यावधी रुपयांची उधळपट्टी करत असल्याचे दु:ख वाटले आणि रागही आला. आजवर केंद्रातल्या भाजपा सरकरने केवळ जाहिरातींवर ११ अब्ज रुपयांच्यावर खर्च केला आहे. सरकार सत्तेत आल्यापासून निव्वळ जाहिरातींचा सपाटा सुरू आहे. उत्सव कधी साजरा करतात? ज्यावेळी आनंद असतो, लोक सुखात, समाधानात असतात त्यावेळी. लोक आपला आनंद साजरा करण्यासाठी कुठला तर उत्सव कुठल्यातरी औचित्याने साजरा करतात. या निकषावर जर आजचा विचार केला तर उत्सव साजरा करण्यासारखी देशाची अवस्था आहे काय? हा प्रश्न देशातल्या प्रत्येक नागरिकाने स्वत:ला विचारायला हवा. पक्ष, गट-तट, मतभेद याच्या पलीकडे जाऊन विचार करत हा प्रश्न स्वत:ला विचारायला हवा. मोदी सरकारची तीन वर्षाची नेमकी उपलब्धी काय? या सरकारने कोणत्या क्षेत्रात भव्य दिव्य काम केले की ज्याचा उत्सव साजरा करावा? प्रामाणिकपणे विचार केला तर लक्षात येईल. जाहिरातीच्या माध्यमातून उभारलेल्या आभासी फिलगुडच्या जाळ्यात फसून अच्छे दिनाचे नारे देणे म्हणजे स्वत:च्या मूर्खपणाबद्दलची उद्घोषणा करणे होय. या देशात असे अनेक मूर्ख शिरोमणी आहेत. ज्यांच्या डोळ्यावर भक्तीच्या पट्ट्या घट्ट बांधल्या आहेत. त्यांना त्यांच्या अंध व अधू नजरेमुळे वास्तव कळत नाही. त्यामुळे ते तसेच बोलणार. पण ज्यांचा मेंदू सक्षम आहे त्यांनी तर या जाहिरातीच्या मायाजाळात न फसता विवेकाने विचार करायला हवा. खरेच आज देशाची अवस्था उत्सव साजरा करण्यासारखी आहे का? तो ही 'मोदी उत्सव'? शेतकरी उत्सव नाही, व्यापारी उत्सव नाही, सांस्कृतिक उत्सव नाही, शैक्षणिक गुणवतांचा विकास करण्यासाठी शैक्षणिक उत्सव नाही. आर्थिक भरभराटी आणण्यासाठी अर्थशास्त्रीय जागृती करणारा उत्सव नाही किंवा भारतीय संस्कृतीच्या विविध महान परंपरांचा, कलागुणांचा उत्सव नाही. 'मोदी उत्सव' म्हणजे काय अन तो नेमका कशासाठी साजरा केला जातोय? हा प्रश्न देशवासियांना पडणार आहे का? हा प्रश्न आपण राज्यकर्त्यांना विचारणार आहोत की नाही? हा उत्सव लोकांच्या पैशातून साजरा केला जातोय म्हणून विचारले गेले पाहिजे. तो जर भाजपवाले पदरमोड करून परत असते तर मोदीच काय 'अनागोंदी' उत्सव साजरा केला तरी आमची हरकत नाही. पण कुणाच्यातरी मोठेपणासाठी राष्ट्रीय संपत्तीची वारेमाप उधळपट्टी करणे योग्य नाही. हा भ्रष्टाचारच आहे. कॉंग्रेसवाले विविध योजना काढून त्यात पैसे हाणत होते. घोटाळे करत होते. या प्रकारामुळे

राष्ट्राच्या संपत्तीची लूट होत होती, उधळपट्टी होत होती. आताही तेच होतंय. फरक इतकाच की ते घोटाळे करत होते अन् हे जाहीरातीच नावाने, उत्सवाच्या नावाने लोकांची दौलत 'दौलतजादा' करताहेत. पण प्रकार उधळपट्टीचाच. एकूण काय तर राष्ट्रीय संपत्तीची वाट लावण्याचेच काम सुरू आहे. या संपत्तीवर सरकारवाल्यांचा नव्हे तर लोकांचा हक्क असतो. कारण ती संपत्ती लोकांच्या कष्टाची असते. त्यांच्या खिशातून कर रूपाने देशाच्या तिजोरीत गेलेली असते. म्हणून 'मोदी उत्सव' म्हणजे भाजपा सरकारचा घोटाळाच आहे.

देशभरातला शेतकरी आज आक्रोश करतोय. त्याच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तो अगतिक आहे. सरकारी धोरणात तो पिचला जातोय. कर्जाला, अडचणींना वैतागून तो मरण जवळ करतोय. गेल्या तीन वर्षात भारतात ३१८२९ इतक्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची आकडेवारी एनसीआरबीचा अहवाल सांगतो. ती ही केवळ पाच राज्यातली. महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश याच राज्यातली ही आकडेवारी आहे. तर सीमेवर शेकडो (सुमारे सातशेपेक्षा जास्त) जवान शहीद झाले. नोटबंदीत सुमारे शंभरच्यावर लोक मेले (मारले) गेले. नोटबंदीनंतर छोटे छोटे व्यवसायिक रसातळाला गेले. देशभरात मंदीचा प्रभाव निर्माण झाला. आज गावा-गावात सर्वांचे भरणपोषण करणाऱ्या बळीराजाची अन् सीमेवरून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांची प्रेतं येत आहेत. असे असताना भाजप सरकार उत्सव साजरा करत असेल तर अवघड आहे. नोटबंदीत मेलेल्या लोकांच्या, तीन वर्षात मेलेल्या शेतकऱ्यांच्या व सीमेवर शहीद झालेल्या जवानांच्या मृत्यूच्या आनंदाप्रित्यर्थ सरकार हा उत्सव साजरा करत नाही ना? असा प्रश्न मनाला पडल्याशिवाय रहात नाही. आज देशाच्या अशा अवस्थेत 'मोदी उत्सव' साजरा करणाऱ्या राज्यकर्त्यांना पाहून रोमची आठवण आल्याशिवाय राहिली नाही. असे म्हणतात की इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. असे असेल तर रोमचा इतिहास आज भारतात अनुभवायास येतो आहे. कारण रोम जळत असताना सत्ताधुंद झालेला निरो फिडेल वाजवत होता. त्याला जळत्या रोमचे भान नव्हते. आज भारतातल्या विदारक वास्तवाकडे डोळे उघडून पाहिल्यावर मोदी एकविसाव्या शतकात निरोचा भारतीय अवतार वाटल्याशिवाय रहात नाहीत. सीमेवर जवानांचे रोज शहीद होणे असेल किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या असतील या घटना देश जळत असल्याचा पुरावा होत नाहीत काय? मग अशा स्थितीत स्वत:च्या कोड-कौतुकाचे उत्सव साजरे करणारी प्रवृत्ती कोडगेपणाचीच नव्हे तर क्रुरतेची परिसीमा वाटत नाही का? आंधळ्या लोकांना दृष्टी अधू असल्याने धोके कळत नाहीत. पण एखाद्याने सावध केले तर पटतही नाही. त्यांना सावध करणाराच्या हेतूबद्दल शंका येते. या ठिकाणी रजनीशांच्या पुस्तकात वाचलेल्या एका कथेची आठवण आल्याशिवाय रहात नाही. दोन मित्र होते. त्यातला एकजण आंधळा होता. दोघे प्रवास करत असताना अंध मित्राला एक काठी सापडते. तो ती हातात घेतो व आपल्या दुसऱ्या मित्राला सांगतो. दुसरा मित्र त्याला सांगतो की, बाबा ती काठी नव्हे. कडाक्याच्या थंडीने गारठलेला साप आहे. तू तो टाकून दे. यावर अंध मित्राला आपल्या मित्राचे खरे वाटत नाही. तो असा विचार करतो की ही काठीच त्याला हवी आहे म्हणून तो खोटे सांगतोय. त्याच्या हेतूबद्दल तो अंध मित्र शंका घेतो. अन् काठी टाकत नाही. परिणामी थोड्या वेळात उन पडते व साप जागा होतो. त्याला चावतो अन् तो मरतो. आज देशभरातले अंधभक्त हेच करत आहेत. त्यांच्या डोळ्यावर भक्तीच्या पट्ट्या बांधल्या आहेत. त्यामुळे त्यांची दृष्टी अधू बनली आहे. त्यांना वास्तवाचे भान यायला तयार नाही. नोटबंदीची घोषणा

राणाभीमदेवी थाटात केली. काळ्या पैशाबाबत, दहशतवादाबाबत, नक्षलवादाबाबत, नकली नोटांबाबत जालीम उपाय म्हणजे नोटबंदी सांगितली गेली. म्हणजे ग्रामीण भागात फिरणारे भोंदू वैद्य जसे 'बिमारी अनेक दवा एक' अशी जाहिरात करून लोकांना मूर्ख बनवतात. अगदी त्याचप्रमाणे दहशतवादावर जालीम उपाय काय तर नोटबंदी, नक्षलवादावर जालीम उपाय काय तर नोटबंदी, काळ्यापैशावर जालीम उपाय काय तर नोटबंदी, नकली नोटांवर उपाय काय तर नोटबंदी असे सांगितले गेले. लोकांची तशी मानसिकता निर्माण केली. रांगेत उभे राहून मरणाऱ्या लोकांबाबत दिलगिरी नाही, माफी नाही. उलट इतरवेळी मरत नाहीत का असे म्हणून त्यांच्या मृत्यूचीही संभावना केली गेली. लोकांना नोटबंदीचा हिशोब या सरकारने द्यायला हवा. पण मोदी किंवा त्यांचे चमचे यावर चकार शब्द काढत नाहीत. 'कॅशलेस'चा मुद्दा आणून नोटबंदीचा विषय 'लेस' केला गेला. नोटबंदीनंतर दहशतवाद थांबला, नक्षलवाद थांबला, काळा पैसा थांबला, नकली नोटा थांबल्या की काळे पैसे असणाऱ्याचे सरकारने काय वाकडे केले? नेमके झाले काय? याचे उत्तर देशाला कोण देणार? मोदी देत नाहीत त्यांचे चमचे देणार का?

खरेतर हा 'मोदी उत्सव' नव्हे तर अनिर्बंध सत्तेतून निर्माण झालेल्या कोडग्या मनाचा 'उन्मादी उत्सव' आहे. बेडकाला थंड पाण्यात ठेवून पाणी हळूहळू गरम केले तर त्याला वाढणाऱ्या तापमानाची जाणीव होत नाही. ते त्या पाण्याच्या बाहेर न पडता त्याच पाण्यात मश्गूल राहते. शेवटी पाण्याचे तापमान शंभर अंशाच्या जवळ गेले की ते तडफडून मरते. अच्छे दिनाच्या भ्रमात असणाऱ्या अनेकी बेडकी प्रवृत्तींना तडफडून मरायची वेळ आली तरी कळणार नाही. कारण त्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करून पाण्याचे तापमान वाढवले जात आहे. त्यासाठीच मोदी उत्सव साजरा केला जातोय. असो, बेडकी प्रवृत्तीच्या बांधवांनो तुमचा व देशाचा आत्मघात होतोय. याचे भान तुम्हाला लवकर यावे हीच इच्छा...!

संपादक - वज्रधारी
९५६१५५१००६

# कापलेली ठसठस

## हिना कौसर खान

‘आय ॲम बोहरा ॲन्ड आय अपोज खतना बिकॉज नो वन हॅज राइट टू टॅम्पर माय बॉडी,’ असं ठसठशीतपणे एका कार्डावर लिहिलेली आरेफा तिच्या फेसबुक वॉलवर दिसते. यातही ‘माय’ या शब्दावर जोर आणि ‘नो वन’ या शब्दाला अधोरेखित. या कार्डवरच्या या छोट्याशा मजकुरातूनच ही तरुणी बोहरा समाजातल्या मुलींची सुंता या अघोरी प्रथेतला दर्द बेखौफ मांडू पाहात आहे.

मुंबईस्थित आरेफा जोहरी. तिशीतली पत्रकार तरुणी. आपल्या समाजात सुरू असलेल्या प्रथेविषयी ‘अळीमिळी’ची छुपी सक्ती असताना तिने मात्र चुप्पी सोडली. एकीकडे या प्रथेला धर्माचं अधिष्ठान देऊन स्त्रीत्वाचं पावित्र्य जपणारी ही गोष्ट असल्याचं ठसवलं जात असताना, आरेफाने ‘माझ्या शरीराचा एक भाग... माझं स्त्रीत्व’ असं म्हणत आपल्या ‘कापलेल्या ठसठशी’ची जाहीर वाच्यता केली. तिने स्वत: असं करणं आणि त्याबाबत इतरही महिलांना ‘बोलत्या व्हा’ म्हणणं, हे कमालीचं धाडस दाखवणारं आहे. आपल्या देशातून बोहरा समाजातील मुलींची सुंता म्हणजे जननांग कापण्याची प्रथा बंद व्हावी, यासाठी आरेफा व तिच्या चौघी मैत्रिणी मिळून एक चळवळ उभी करत आहेत. या पाच जणींनी ‘सहियो’ ही संस्था स्थापन केली असून या माध्यमातून त्या बोहरा समाजात प्रत्यक्ष जनजागृतीसाठी झटत आहेत. इतकंच नव्हे तर, या प्रथेविरुद्ध जनरेटा तयार करण्यासाठी विविध संस्थांसोबत मिळून ऑनलाइन सह्यांची मोहीमही राबवत आहेत.

मुळात आपल्याकडे बोहरा समाजात मुलींची सुंता करण्याची अघोरी प्रथा अद्यापही सुरू आहे, याबाबत मुस्लीम समाजही काहीसा अनभिज्ञ आहे. ही प्रथा दाऊदी बोहरा समाजात मोठ्या प्रमाणावर राबविली जाते. अतिशय गुप्तपणे या प्रथेची अंमलबजावणी होत असल्याने साहजिकच त्याविषयी खुलेपणानं न बोलणं आलंच. पण आज आरेफा स्वत:च्या अनुभवकथनानेच या प्रथेच्या विरोधाला सुरुवात करते. या अघोरी प्रथेची वेदना आरेफाने स्वत: अनुभवली आहे. ही तिची अतिशय खाजगी बाब आहे. पण त्या घटनेचे तिच्या मनावर उमटलेले व्रण ती अजूनही विसरू शकलेली नाही. आरेफा सांगते, ‘‘मी सात वर्षांची होते. त्यावेळी माझ्या आईने मला एका अनोळखी बाईकडे खत्ना/सुंता करण्यासाठी नेले. मला ठाऊक नव्हते की, तिथं जाऊन काय घडणार आहे. तिथं गेल्यावर मला झोपवण्यात आलं. अन्य काही स्त्रियांनी माझे दंड वगैरे धरून ठेवले. मग माझे पाय फाकवले. पुढे काहीतरी घडणार आहे, याची मला अजिबात कल्पना नव्हती. दिलाशाखातर माझी आई मला म्हणाली, ‘‘बेटा, बस थोडासा दर्द होगा और एक मिनिट मैं खतम होगा.’ आई सांगेल त्यावर विश्वास ठेवण्याचं ते वय. त्यानंतर त्या अनोळख्या बाईनं ब्लेड हातात घेतला आणि माझ्या शरीराच्या खालच्या भागातलं काहीतरी झपकन कापलं. मला खूप दुखलं होतं. मी खूप रडत राहिल्याचंही मला आठवतंय. माझी आई सांगते की, रक्त आलं नव्हतं. पण दुखत होतं. दोन दिवसांत दुखणंही कमी झालं. आपल्यासोबत नेमकं काय झालं हे समजण्याचं माझं वयच नव्हतं.’’ आरेफा हे सांगत होती, तेव्हा अंगावर सर्रकन काटा आला. क्षणभर काय बोलावं हेच सुचेनासं झालं.

मग ती सांगू लागली की, ‘‘थोडं आणखी मोठं

झाल्यावर माहीत झालं की, खत्ना नावाचा प्रकार पुरुषांबरोबर होतो. अर्भकावस्थेतच ही खत्ना केली जाते आणि मुलींची सात वर्षांच्या झाल्यावर. या माहितीचाही माझ्या जगण्यावर तसा काही परिणाम झाला नाही. पण जेव्हा मी कॉलेजात जाऊ लागले, आसपासच्या गोष्टींकडे संवेदनशीलपणे पाहू लागले तेव्हा ही प्रथा काय आहे याचाही उलगडा होऊ लागला. स्त्रियांना आयुष्यभर आतोनात त्रास देणाऱ्या प्रथेची समज वाढायला लागली. अगदी लहान वयात मुलींवर जबरदस्तीच ही प्रथा थोपविली जाते का तर म्हणे त्यांची कामभावना जागी होऊ नये. धर्माच्या नावाने ही प्रथा चालवून महिलांच्या लैंगिक भावनांना कथित शिस्त लावण्यासाठी हा प्रकार केला जातो असे सांगितलं जातं. असं करण्यामागं कारणं ढीगभर आहेत. वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळी, पण बहुतांश स्त्रियांच्या लैंगिक भावनेशी निगडीत हे सगळं समजू लागल्यावर सुरुवातीला मी घरात, आईजवळ, याविषयीची चिडचिड व्यक्त करायचे, माझ्या कुटुंबातच त्यावर बोलायचे, चर्चा करायचे. पण ते सगळं माझ्यापुरतंच होतं.'' आरेफाच्या मनात या प्रथेविषयी घृणा आणि अस्वस्थता होती. परिणामी सुंता ज्याला इंग्रजीच फीमेल जेनिटल म्युटिलेशन म्हणतात, तो शब्द कानावर पडला की तिचे कान टवकारायचे. एका बोहरा स्त्रीने change.org या पोर्टलवर २०११ मध्ये एक मोहीम सुरू केली. त्याद्वारे तिने बोहरा समाजातील धर्मगुरू सय्यद यांना विनंती केली होती की बोहरा समाजातून या प्रथेला हद्दपार करा. या पोर्टलमुळे याविषयीच्या काही बातम्या माध्यमांत झळकू लागल्या आणि आरेफालाही वाटू लागलं की याविषयी आपल्याला सार्वजनिकरित्या काहीतरी मांडायचं, बोलायचं आहे.'' या पोर्टलने मला बळ मिळालं. हा विषय केवळ आपल्यापुरता नसून याविषयी जाहीरपणे मत मांडण्याची गरज आहे. पण बोलोयचं म्हटलं तरी कुठं आणि कसं हा प्रश्न होताच.'' मग तिने माध्यमातून, सोशल मीडियातून भूमिका घ्यायला सुरुवात केली. या प्रथेने होणारा त्रास, वेदना मांडता मांडताच ही प्रथा कशी अनावश्यक, स्त्रीत्वाला काळीमा फासणारी आहे अशी टोकदार मते ती मांडू लागली. त्याच सुमारास, प्रिया गोस्वामी ही तरुणी बोहरा समाजातील मुलींच्या सुंता प्रकरणावर शॉट फिल्म बनवत होती. या फिल्ममध्ये तिने प्रत्यक्ष सहभाग नोंदवून या प्रथेविषयीा परखडपणे सांगितलं. यानंतर तिला प्रकर्षाने जाणवू लागलं की किमान यापुढे तरी बोहरा समाजातील मुलींना सुंता प्रकाराच्या वेदनांपासून मुक्ती मिळायला हवी, यासाठी काम करण्याची गरज आहे.

आरेफासारख्याच विचार करणाऱ्या मारिया ताहेर, शाहीदा तवावाला, प्रिया गोस्वामी, इन्सिया दारीवाला या चौघी एकत्र आल्या. या पाच जणींनी 'सहियो' संस्थेची स्थापना केली. आरेफा म्हणते, ''सहियो म्हणजे मैत्रिणी. हे नाव आम्ही जाणीवपूर्वक ठेवलेलं आहे. आम्ही आमच्या समाजात मैत्रीपूर्व नात्याने मिसळून प्रश्नाला हात घालू इच्छितो. आमचा विरोध प्रथेला आहे. समाजाला नाही. या संस्थेत जनजागृती व माध्यमांशी बोलण्याचं काम मी करते, 'असंही ती नमूद करते.

आरेफा व तिच्या मैत्रिणींनी दोन वर्षांपूर्वी ही संस्था सुरू केली. मारिया सामाजिक कार्यकर्ती, आरेफा पत्रकार, प्रिया आणि इन्सिया फिल्ममेकर, शाहीदा, एका धाग्यात गुंतून बांधल्या गेल्या. करिअर सांभाळत त्या काम करताहेत. मुळात या पचही जणी एकेकट्या, आपल्याला स्तरांवर सुंता प्रथेविरुद्ध बोलत होत्याच. पण त्यांच्या एकत्र येऊन काम करण्याने त्यांच्या कामाला बळकटी मिळाली. सुंता प्रथा बंद करून दाऊदी बोहरा आणि आशियातील बोहरा समाजातील स्त्रियांना सक्षम करण्यासाठी संस्था काम करतेय. संस्थेची स्थापना झाली की काम करण्यासाठी हाती काही मुलभूत माहिति असावी लागते. त्या तथ्याचा वापर करून कार्यक्रमाची दिशा ठरवता येते.

इथं मात्र तसं काहीही नव्हतं. मुळात भारतातील मुस्लिम समाजातील बोहरा समूहात अशी प्रथा अद्याप सुरू आहे याची माहितीच इतर भारतीय मुस्लिमांना नव्हती. अशा स्थितीत काम सुरू करायला या तरुणी निघाल्या होत्या. म्हणून मग त्यांनी सर्वांत आधी तथ्यसंकलनाच्या अनुषंगाने कामाला सुरुवात केली. आरेफा सांगते, '' आजतागायत भारतात किती बोहरा मुलींची सुंता झालीये, याची माहितीच उपलब्ध नाही. म्हणून जून २०१५ पासून आम्ही ऑनलाइन सर्वेक्षण घेण्याचे ठरवले. आतापर्यंत ३८५ बायकांनी या तसहभाग घेतला आणि त्यातील ८०% महिलांची सुंता झालेली आहे. हे संशोधन सुरूच ठेवण्याची गरज आहे. बायकांनीही मोकळेपणाने बोलायला हव. शिवाय फिल्डरचे उपक्रमही राबवतो. गेल्या वर्षी 'ईच वन रीच वन' मोहिमे अंतर्गत आमच्या कामाशी निगडीत प्रत्येकाने किमान एका महिलेशी सुंता या विषयावर बोलायचे, त्यांचे म्हणणे समजून घ्यायचे, हा उपक्रम केला.

सहियोच्या वेबसाईटवर आपबीती गोष्टी अनुभवाच्या स्वरूपात मुलीमहिलांनी सांगण्यासाठी प्रोत्साहन देते. त्यांच्या गोष्टी साइटवर प्रसिद्ध केल्या जातात. आपलीच गोष्ट सांगून टाकली की बायकांना हायसं, मोकळं वाटतं. दुसरं, आपण एकटेच ही प्रथा बंद व्हावी म्हणत नाहीयेत तर असे अनेक जण आहेत. ही गोष्ट उभारी देते. इथं पुरुषही आपली मतं मांडतात, ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवून ही मोहीम पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आह. पठडीतल्या भाषणबाजीने ही प्रश्न सुटणार नाही. लोकांशी प्रत्यक्ष संवादच समज-गैरसमज गाळायला मदत करतात. त्याचाच भाग म्हणून 'थाल पे चर्चा' उपक्रम राबविले. ज्यात काही बायकांसोबत आम्ही बोहरा पद्धतीचे जेवण बनवून जेवता जेवता विविध विषयांवर चर्चा असे स्वरूप ठेवले हाते. अनौपचरिक वातावरणामुळे बायकाही मोकळ्या होतात. दडपणाशिवाय बोलतात.

आरेफा आपल्या संस्थेच्या पसाऱ्याविषयी सांगते, केवळ भारतापुरतंच काम करायचं डोक्यात नाहीये. सोबत अन्य देशांतील बोहरा स्त्रियानाही कवेत घेण्याचा विचार आहे. या पाच जणींपैकी तिची संस्थापक भारतात, एक हाँगकाँगमध्ये आणि एक अमेरिकेत आहे. बोहरा समाज जगभर पसरलेला असल्याने सीमारहित काम करण्याचं उद्दिष्ट संस्थेने ठेवलंय. आरेफा जेव्हा हे सगळं सांगत होती, त्या वेळी ती इतक्या नाजूक विषयावर पहिल्यांदा बोलू लागली तेव्हा घरच्यांची कशी प्रतिक्रिया उमटली, हा विचार डोक्यात आला. सर्वांसमक्ष सुंता ही अघोरी प्रथा आहे असं म्हणण्याचं बेअरिंग तिनं कसं सांभाळलं असेल. कारण प्रथांना कथित धर्माचं अधिष्ठान असतंच.

प्रश्नांचा असा गुंताच तिच्यापुढे ठेवल्यावर ती अगदी सहज म्हणाली, ''माझ्या कुटुंबाकडून पाठबळ मिळालं.'' या विषयावर ती आईची खुलून संवाद साधू लागली आणि आईनेही तिला समजून घेतलं. ती म्हणते, ''माझ्या कुटुंबाने मी काय करतेय हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडून कुठलीच अडचण नाही आली. सुरुवातीला नातेवाईकांकडून नकारात्मक प्रतिक्रिया आल्या, ते साहजिकही होतं. मी हे चुकीचं, धर्मविरोधी करतेय असंही काहींना सुनावलं. पाच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका काकूंनी सांगितलं की, मुलींची खत्ना करणं हा प्रेषित मोहंमद यांचाच आदेश आहे. असं न करणं म्हणजे आपण चूक तर आहोतच, पण ज्या मुलींची खत्ना केलेली नसते, त्यांना वेश्या समजले जाते. इतक्या तिखट शब्दांत टीका करायचे. पण आम्ही चिकाटी सोडली नाही. हळूहळू त्यांचीही इयत्ता वाढत गेली. आता नातेवाईकांतील स्त्रियांना माझ्या कामाचं महत्त्व समजू लागलंय हे आश्वासक आहे.'

ती हे सगळं स्त्रियांच्या अनुषंगाने सांगत होती. त्याच वेळेस मनात आणखी एक प्रश्न डोकावला. मुस्लिम समाजात मुलांचीदेखील सुंता केली जाते. स्त्रियांच्या सुंतीविरोधी इतकं बोललं जात असताना पुरुषांच्या

सुंतेविषयी काहीच बोललं जात नाही. या दोन्हीत नेमका फरक असावा? ही भानगड काय आहे? यावर ती तत्काळ म्हणते, ''मुलांची सुंता ही कुठल्याही प्रकारे लैंगिक भावभावनांशी, लैंगिक सुखाशी निगडीत बाब नाहीये. शिवाय त्यांच्या कुठल्याच जननअंगावरहीा याचा परिणाम होत नाही.

विविध वैद्यकीय तज्ज्ञ मुलांच्या सुंतेमुळे त्यांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होत नसल्याचं सांगतात. मात्र स्त्रियांची सुंता ही प्रथा निव्वळ पुरुषी मानसिकतेतून निपजलेली आहे. सुंता करण्यामागची भूमिकाच स्त्रियांचे लैंगिक भाव नियंत्रित राहावे हा आहे. शिवाय सुंता करताना स्त्रियांचे जननांग जितके खोल कापले गेले असेल तितका जास्त त्यांच्या प्रजनन यंत्रणेवर परिणाम होता. सुंता झालेल्या स्त्रियांना शरीरसंबंधांच्या वेळेस, प्रसूतीच्या वेळेस असह्य वेदनांना सामोरे जावे लागते. त्यामुळे या दोन्ही प्रकारात खूपच फरक आहे. आपल्याकडे आफ्रिकेप्रमाणे अगदी खोल कापले जात नाही. केवळ क्लिटोरिस कापले जाते, पण यालाही सुंताच म्हटले जाते आणि तेही तितकेच वेदनादायी आहे. हे सगळं पाहता केवळ महिलांच्या भावना दडपण्यासाठी ही प्रथा जन्माला घातली गेली आहे हे स्पष्टच आहे. त्यामुळे आम्ही मुलींच्या सुंता प्रथेचा विरोध करतो.''

वर्षानुवर्षे सुरू असलेल्या प्रथेविरुद्ध बोलायला सुरुवात केल्यानंतर धर्मगुरूंकडून, मुल्ला मौलवींकडून विरोध होणारच. साधारण २०१६ पर्यंत बोहरा समाजातील धर्मगुरुंनी मुलींच्या खत्नाविषयी जाहिररित्या कधीही कोणतीही भूमिका घेतलेली दिसत नाही. ती करा वा करू नये असं काहीही मांडलेलं दिसत नाही. मात्र आताचे धर्मगुरू सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन यांनी मुलींच्या सुंताचे समर्थन केले आहे. धार्मिक शुद्धीसाठी सुंता आवश्यक असल्याचं त्यांनी नमूद केल्याचं आरेफा सांगते. धर्मगुरूंकडूनच अशी माहिती सांगितली गेलीतर सर्वसामान्य लोक अशा प्रथांना बळी ठरतात. त्यामुळे जनजागृतीसाठी आम्हाला अधिक सक्रीय होण्याची गरज आहे. अशी जबाबदारीची भावनाही आरेफा बोलून दाखवते.

या विषयावरच्या जागरणाचा भाग म्हणून पाकिस्तानात झालेल्या महिला आंतरराष्ट्रीय परिषदेतही ती सहभागी झाली होती. तिथं तिने पहिल्यांदाच प्रत्यक्ष लोकांसमोर स्वत:च्या सुंताविषयी सांगिते. त्यावेळेस बायकांनीही आश्चर्याने अशी सुंता करण्याची पद्धत मुस्लिमांमध्ये खरंच आहे? असे विचारले. हा प्रश्न किती दुर्लक्षित आहे हे यावरूनच कळते. बोहरा समाजात छुप्या पद्धतीने हे सर्व केलं जातंय. आताही ब्लेड किंवा धारदार वस्तू वापरून अशी सुंता केली जाते. त्यात थोडा बदल होतोय. मुलींना बोहरा डॉक्टरांकडे नेले जाते व ते काही प्रमाणात तथाकथित स्वच्छ उपकरणाने सुंता करतात. हे सगळं अनाकलनीय असलं तरी वास्तव आहे.

अर्थात हे सगळं एकीकडे सुरू अलं तरीही सध्या त्यांच्या कामामुळे सकारात्मक बदलही घडत आहेत. बहुतांश लाकांना या प्रथेतला फोलपणा पटलाय. मात्र ते समोर येऊन या प्रथेचा विरोध करत नाहीयेत. त्यांनी गुप्तपणे या संस्थेला सहकार्य आणि पाठिंबा दिलाय. या पाठिंबा निव्वळ शब्दांतला नाहीये तर आपल्या मुलींची सुंता करणार नाही, ही भूमिकाही त्यांनी घेतलीय. उघडपणे या विषयावर बोलल्यास समाजातून हकालपट्टी होण्याची भीती या लेकरांच्या मनात आहे. पण हरकत नाही, मुलींची सुंता न करण्याचा निर्णय घेणं हे जास्त महत्त्वाचं आहे. ''अगदी पुरुष भेटून किंवा ऑनलाईन माध्यमातूनही सांगतात की, त्यांच्या मुलींसोबत असं घडणार नाही, अन्य कुणा मुलीबरोबर होत असेल तरी ते रोखलं जाईल. असा पवित्रा घेताना ते दिसतात, हे सगळं बळ देणारं आहे,'' असं आरेफा आवर्जून नमूद करते. तिला मात्र समाजातून बॉयकॉट केलं जाईल, याची भीती नाहीये. माझ्या मनातलं बोलण्यासाठी आणि न्याय्य भूमिका घेण्यासाठी मला कोणाच्याही परवानगीची गरज

नाहीये, त्यामुळे मला कधी भीती वाटली नाही.'' आरेफाची ही निडण मांडणी सुखावणारी आहे.

तिच्या या जाणिवा वाढण्यामध्ये शिक्षणाचाही वाटा तिला जाणवतो. तिने 'इंग्लिश लिटरेचर ॲन्ड कल्चरल स्टडीज' विषयातून पदवी घेतलीय. यामध्ये काही प्रमाणात स्त्रीवाद शिकायला मिळतो. स्त्रीवाद, स्त्रियांविषयीची संवेदना या सगळ्या गोष्टी नेणिवेत निपजत होत्या. त्याला सुंता या विषयाची जोड मिळाली आणि विचार अधिक पक्के, प्रगल्भ होत गेल्याचं आरेफाला वाटतं. याबरोबरच पत्रकाराची समज, पत्रकाराची नजरही तिला तितकीच महत्त्वाची वाटते. पत्रकारितेत असणारे मुलभूत तथ्य पडताळणी, माहितीची खात्री करून घेणे, खोलात जाऊन विचार करणे आणि त्याची सुसूत्रित मांडणी करणे हे सर्व कौशल्य तिला सहियोच्या कामातही उपयोगी ठरतात. अंधपणे कुठलीही माहिती न स्वीकारता संशोधनाअंतीच लोकांपर्यंत पोहोचवल्याने लोक पाठिंबा देत आहेत. हे सकारात्मक आणि छान वाटणारं आहे. तरीही 'माइल्स टू गो...' असं आरेफा मान्य करते, तेव्हा काम करण्याची तिची तळमळ लक्षात आल्याशिवाया राहात नाही.

## वड

तो उभाय कधीचा निश्चल
घनदाट निबिड पारब्यांचा
डोलारा सांभाळत.
काळ्या कुरळ्या
राठ केसांना
मध्येच ब्राऊनीश हायलाईट करून...
स्वत:तल्याच अरण्याच्या
गोतावळ्यात
शिरू पाहतोय तो
मातीच्या गर्भाशयात
हजारो स्पर्म घेऊन

लखलखीत धारदार
पात्याच्या युगातही
खाली मान घालून
जमिनीच्या पोटात
शिरत जातोय तो खोल खोल...
मुरूम, रेती, दगड फोडून
क्राँक्रिटच्या ओसाड जंगलात
ओल टिकवू पाहतोय तो
यम-सावित्री-सत्यवानाच्या
मिथकाची मुळे रोवत
तो उभाय कधीचा निश्चिल

हिरव्यागार पानांची
थंडगार सावली देत
माझ्याही अंतरंगात
शिरत जातो.
हजार हातांच्या पारंब्यानिशी
मी गुंतवत जाते स्वत: त्याच्यात
मातीत मुळं गुंतावी
तशी
तो आणि मी
हातात हात घालून
शोधत जातोय पृथ्वीत खोल खोल
मातीची हरवलेली ओल

**सारिका उबाळे**

# नांगेली का कापलसं तू तुझं स्तन!

वर्ष होत १८०३
पानथळीचा प्रदेश;
समुद्र किनाऱ्याजवळचा
गाव होता चेरयाल
राज्य केरळ
तिथं होती जळतं;
एक क्रांती...
तिचं नाव होत नांगेली...
नांगेली, काय केलस हे तू?
तुझे स्तन कापलेस तू
स्वत:च?
आपल्याच खोपट्यात
फळ चिरा व तसं
नि काय केलस स्तन कापून?
तर केळीच्या पानात
ठेवलंस त्यांना
जसं काही जेवायचं पान मांडा व
रक्ताचे थेंब ठिबकायला लागले
काठांवरून पानांच्या
तरी तू उभी राहून
चालत राहिलीस
बाहेर आलीस
आपल्या खोपट्यातून
कशीबशी पोचलीस तू
कशीबशीच...
माझी आईऽऽऽ
सैनिकांच्या सावल्यापर्यंत
तुला तुझे स्तन अर्पण करायचे होते...
कुणासाठी?
कशासाठी?
कुणी सांगितलं होतं असं करण्यास?
कुणीच नाही?
मग का केलंस हे नांगेली?
थारोळा झाला रक्ताचा
कोसळलीस जेव्हा त्या सावल्यांत
तुझ्या कापलेल्या स्तनांसह सैनिकाजवळ...
तुझा नवरा चिरूकंदन
तो होता बाहेर
कुठंतरी कामासाठी
नि तू अशी विनास्तनांची
जमिनीवर आडवी
सैनिकांच्या पायाजवळ...
डोळ्यांत उडाली धूळ तुझ्या
डोळे बंद झाले तुझे,
म्हणजे बंदच झाले ते कायमचे
पण शेवटच्या श्वासांपर्यंत
वाट पाहत
वाट पाहत राहिलीस तू
चिरूकंदनचं नाव घेत राहिलास
नि मग अखेर संपून गेलीस तू
तुझी भेट झालीच नाही
तुझ्या चिरूकंदनची
काय झाले होते
नांगलीला आपले स्तन कापावे असे?
वेडी होती का नांगेली?
म्हणून त्यांना संपवणारे हे असे कर

कष्टकऱ्यांना नागवणारे कर
राबवणाऱ्यांना नावडणारे कर
नंदी - कर म्हणजे कुठल्यांच्या
केसांवरचे कर...
नांगोलीला हे कळले तेव्हा
तिचे रक्तच उसळले
हे काय विपरीत!
डोळ्यांत उतरले रक्त तिच्या
तिने साफ इन्कार दिला
हा कर भरायला
पण तरी काय?
कर हा भरावाच लागला असता
तो भरावाच लागतो फॅस्टिट राज्यात
सैनिक नांगोलीच्या स्तनांचे
मोजमाप घेण्यास
खोपटाबाहेर आलेसुद्धा
आता मात्र हद्द झाली...
नांगेलीने स्तन कर भरलाच नाही
मात्र आपले स्तनच कापून
अर्पण केले सैनिकांना
या अघोरी व्यवस्थेला
काय करू शकत होती नांगेली?
इतरांसारखे करू भरू शकत नव्हती नांगेली?
काय करू शकत होती नांगेली?
आपले स्तनच कापून
तिने घडवली एक क्रांती
व्यवस्थेसमोर उभी केली
एक नवी लढाई,
व्यवस्थेलाच धक्का देणारी एक
लढाई...

**दीपक बोरगावे**